१. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
अ. नं.
२७/११/१९२४



वर्णावीं । सज्जनवृंदें मनोभावें आधीं वंदावीं ॥ —एकनाथ.

# आख्यान-रत्न-माला.

ग्रंथ सं. ... नं. १०४ ... ता. ...

पुस्तक पांचवें



मंदारमाला.

अशा दूरं लोक-कल्याण व्हाया जिला ठेविलें त्र्यंबकानें शिरीं,
तीरीं जिच्या संत झाले, तयांचा अमूल्यांक तो अन्य देशांतरीं
...ड्र-पुत्रां सदा खेळवी जी निजांकावरी
...पें जी असे तीच ही माय गोदावरी।

REFBK-0002843

संग्राहक व प्रकाशक
गणेश अनंत सराफ, नांदेड (निजामस्टेट)
शके १८४६.] [ किं. आठ आणे.
मुद्रक—द. गो. सडेकर मालक धनंजय प्रेस, खानापूर–बेळगांव.

# नारदाची गादी.

मालेच्या चवथ्या पुस्तकांत दर्शविलेल्या अडचणींतून मुक्त होण्यास एकच मार्ग ह्मटला ह्मणजे तो हा कीं, मालेचें **सातवें** पुस्तक–दुसऱ्या वर्षाचें पहिलें पुस्तक रु० २। वा. व. आगाऊ देऊनच ग्राहकांनीं घ्यावें. त्या योगानें प्रत्येक वेळीं व्ही. पी. करण्याचा व न स्वीकारतां परत आल्यास आह्मांस होणारा वेळेचा व पैशाचा खर्च पडणार नाहीं; व त्याचप्रमाणें ग्राहकांसहि खर्च विनाकारण सोसावा लागणार नाहीं. क्रमाक्रमानें आह्मी जीं पुस्तकें प्रसिद्ध करीत आलों, त्यांवरून आमच्याविषयींचा विश्वास आश्रयदात्यांच्या ठिकाणीं दृढ होण्यास कांहीं हरकत नाहीं. तरी वरील लिहिण्याकडे त्यांचें लक्ष वेधावें हें उत्तम. आतां एकच पुस्तक प्रसिद्ध करून या वर्षापुरतें तरी ग्राहकांच्या ऋणांतून आह्मी मुक्त होणार आहों.

ग्राहकांस एक महत्वाची सूचना देणें आह्मांस कांहीं अनुभावरून भाग पडत आहे; ती ही कीं, त्यांनीं आपला पत्ता जर बदलला तर तो तावडतोब आह्मांस कळविण्याची तसदी घ्यावी. पुस्तकें पाठवूनहि तीं त्यांना न पोंचतां, एखादेवेळीं भलत्याच्याच हातीं पडतात; व मग पुनः त्यांची मर्जी सांभाळण्याकरितां त्या पुस्तकाची निराळीच प्रत पाठवावी लागते. पण सर्वांसच सविनय विनंति ही कीं, अशा गोष्टींत नुकसान सोसणें मालेच्या बाल्यावस्थेंत परवडत नाहीं; तेव्हां याकडे त्यांनीं दुर्लक्ष करूं नये अशी विनंति आहे.

यांतील नूतन कवि श्री. कृष्णाजी रामचंद्र **केळकर** यांनीं मालेला आश्रय देऊन आपलें नवीनच आख्यानात्मक काव्य मालेंत प्रसिद्ध करण्याकरितां पाठविलें, याबद्दल आह्मी त्यांचे आभारी आहों.

| | | |
|---|---|---|
| नांदेड | } | सर्वांचा नम्र, |
| **नृसिंह-जयंति १८४६** | } | **गणेश अनंत सराफ.** |

REFBK-0002843

संग्रहालय 2083

# अर्पण.



श्लोक ( मंदाक्रांता. )

आर्ये ! माला बुधजनिं तुला अर्पिल्या शारदेला
त्यांची संख्या अमित परित्यां त्वां दिलें मान्यतेला
तैसा माझा जननि ! लघुसा यत्न हा मान्य व्हावा
सत्कार्यीं या निज पद-रता त्वां यशोलाभ द्यावा

---

## अनुक्रमणिका.


१ नारदाची गादी. ( प्रकाशकाचें हृद्गत. ) ... ... १
२ पाड्गुण्यांचा परामर्ष. ... ... ... ... २
३ मंगलाचरण ( संतकवि दासगणू. ) ... ... ३
४ कवि-परिचय ... ... ... ... ... ४
५ श्रीसंत मिराबाई. ( संतकवि दासगणू. ) ... ... १ ते १६
६ श्रीहरिश्चंद्र. ( कवि राम-सुत ऊर्फ कृष्णाजी रामचंद्र केळकर. १ ते १६
७ गरुड-गर्व-हरण. ( ( कविवर्य चूडामणि-सुत. ) ... १ ते ८
८ पतितोद्धार. ( कविवर्य रुक्मांगद-सुत. ... ... १ ते ४

# नारदाची गादी.

मालेच्या चवथ्या पुस्तकांत दर्शविलेल्या अडचणींतून मुक्त होण्यास एकच मार्ग सुचला ह्मणजे तो हा कीं, मालेचें **सातवें** पुस्तक—दुसऱ्या वर्षाचें पहिलें पुस्तक रु० २। वा. व. आगाऊ देऊनच ग्राहकांनीं घ्यावें. त्या योगानें प्रत्येक वेळीं व्ही. पी. करण्याचा व न स्वीकारतां परत आल्यास आह्मांस होणारा वेळेचा व पैशाचा खर्च पडणार नाहीं; व त्याचप्रमाणें ग्राहकांसहि खर्च विनाकारण सोसावा लागणार नाहीं. क्रमाक्रमानें आह्मीं जीं पुस्तकें प्रसिद्ध करीत आलों, त्यांवरून आमच्याविषयींचा विश्वास आश्रयदात्यांच्या ठिकाणीं दृढ होण्यास कांहीं हरकत नाहीं. तरी वरील लिहिण्याकडे त्यांचें लक्ष वेधावें हें उत्तम. आतां एकच पुस्तक प्रसिद्ध करून या वर्षापुरतें तरी ग्राहकांच्या ऋणांतून आह्मीं मुक्त होणार आहों.

ग्राहकांस एक महत्वाची सूचना देणें आह्मांस कांहीं अनुभवावरून भाग पडत आहे; ती ही कीं, त्यांनीं आपला पत्ता जर बदलला तर तो तावडतोब आह्मांस कळविण्याची तसदी घ्यावी. पुस्तकें पाठवूनहि तीं त्यांना न पोंचतां, एखादेवेळीं भलत्याच्याच हातीं पडतात; व मग पुनः त्यांची मर्जी सांभाळण्याकरितां त्या पुस्तकाची निराळीच प्रत पाठवावी लागते. पण सर्वांसच सविनय विनंति ही कीं, अशा गोष्टींत नुकसान सोसणें मालेच्या बाल्यावस्थेंत परवडत नाहीं; तेव्हां याकडे त्यांनीं दुर्लक्ष करूं नये अशी विनंति आहे.

यांतील नूतन कवि श्री. कृष्णाजी रामचंद्र **केळकर** यांनीं मालेला आश्रय देऊन आपलें नवीनच आख्यानात्मक काव्य मालेंत प्रसिद्ध करण्याकरितां पाठविलें, याबद्दल आह्मीं त्यांचे आभारी आहों.

| | | |
|---|---|---|
| नांदेड | } | सर्वांचा नम्र, |
| **नृसिंह-जयंति १८४६** | } | **गणेश अनंत सराफ.** |

REFBK-0002843
संग्रहालय
२०७३

# पाहुण्यांचा परामर्ष.

[ नियतकालिकांप्रमाणें मालेंतून पोंच व अभिप्राय देण्याचा प्रघात नाहीं, तथापि आलेल्या पाहुण्यांचा परामर्ष घेणें, योग्य असल्यामुळें आम्ही त्यांच्या इच्छेवरून तसें करीत आहों. प्र. ]

**भारतमित्र** ( सं. नारायण भास्कर नाईक रिवण गोवा, वा. व. २॥ रु. ) मराठी वाङ्मयाचा उत्कर्ष जेथून होईल त्या स्थानाबद्दल व ज्या साधनानें होईल त्या साधनाबद्दल कोणाहि महाराष्ट्रियास अभिमान वाटेलच वाटेल. अशापैकींच ' भारत–मित्र ' हि अभिनंदनीय आहे, असें आह्मांस वाटतें. यांतील ' मित्राचे–किरण ' भोंवतालच्या दोषात्मक रोगजंतूंना नष्ट करण्यास समर्थ आहेत.

**स्वयंसेवक** ( सं. वि. का. प्रियोळकर फोंडा–गोंवा वा. व. २॥ रु. ) या मासिकाचा ४ थ्या वर्षाचा ५ वा अंक संपादकाकडून आमचेकडे आला आहे. यांतील डॉ. श्रीधर व्यंकटेश **केतकर** सं ज्ञानकोश यांचा व खुद्द संपादकांचा असे दोन वाचूनच या मासिकाचा दर्जा किती उच्च आहे, हें दिसून येणार आहे. इतरलेखहि वाचनीय व मननीय आहेत. शिवाय ' स्वयंसेवकाचें ' इतस्ततः परिभ्रमण निदान गोंवा प्रांतापुरतें तरी हिंदु-समाजाला सुफलदायी होईल असें आह्मांस वाटतें.

**संत नामदेव** ( मासिकपत्र सं. शांताराम सांवळाराम मिरजकर मुंबई ) या पत्राचे पहिले चार अंक आमच्याकडे आले आहेत. याचें ध्येय, सामाजिक, धार्मिक, औद्योगिक आणि राजकीय ह्या बाबतींत नामदेव—समाजोन्नति करणें, " हें संपादकांनीं आपल्या परिचयांत सांगितलें आहे; व आमच्याकडे आलेल्या चार अंकावरून हें मासिकपत्र हळुंहळूं व दृढनिश्चयानें हें ध्येय गांठील असें आह्मी ह्मणतों. नामदेवाच्या पायरीची प्राप्ति ह्या सामाजिक लढ्याचा प्रश्न ब्राह्मण–ब्राह्मणेतरांनीं विचार करण्यासारखा आहे. व नामदेव समाज तो लढा शांतपणें शेवटास नेईल असा संपादकांच्या विनम्र लेखणीवरून आह्मास विश्वास वाटतो.

वरील नियत कालिकांस चिरायुष्य चिंतून भेट पाठविणारांचे आह्मीं आभार मानितों.

# आख्यान-रत्न-माला.

## मंगलाचरण.



संतकवि—दासगणू.

पद [ रा. भूप. ता. त्रिवट. ]

रमावरा ! सजल जलदसम श्याम-कमलनयना ! ध्रु०

धीरा ! वीरा ! रघुकुमरा !

दशकंधर-रिपु, वायु-तनय-पति कलिमथना १

निरंजना ! दयाघना ! जनार्दना !

पीतवसन धृतकौस्तुभ, तूं हे परिपूर्णा ! २

चाप करीं, मुगुट शिरीं शोभे हरि

मृगलांछन-तिल भाल भूषवी अघशमना ! ३

वारी सारा ताप खरा

पंढरिनाथा ! अनंतशक्ते ! दाव गणुस चरणा ४

## ❀ कविपरिचय.

रामसुत—यांचें पूर्ण नांव श्री. कृष्णाजी रामचंद्र केळकर भिलवडीकर. या विद्यमान अर्वाचीन कवींचा जन्म शके १८२२ पौष शुद्ध ६ रोजीं झाला असून यांचें राहण्याचें मूळ गांव कोंकणांतील नेवरें ढोकंवळें हें होय. हे सध्यां मराठी शाळाखात्यांत शिक्षक असून सातारा जिल्ह्यांतील भिलवडी येथें राहत असतात. यांनीं शके १८२१ च्या कार्तिक शुद्ध १ पासून आपलें लक्ष कवितेकडे वळविलें आहे, तथापि पुण्याच्या 'स्वधर्म' पत्रांतून ते नुकतेच महाराष्ट्राला परिचित होऊं लागले आहेत. त्यांनीं रचलेलें हरिश्चंद्राख्यान त्यांचा नूतन व व पहिलाच प्रयत्न या दृष्टीनें या पुस्तकांत दिलें आहे.

---


# आख्यान-रत्नमाला-नांदेड.

या मालेंत अर्वाचीन कवींनीं रचलेलीं कीर्तनोपयोगी आख्यानें दिलीं जातील. ह. भ. प. संतकवि दासगणू महाराजांचींही प्रेमळ व प्रासादिक आख्यानें येतील.

वर्षांतून सहा पुस्तकें निघतील. पुस्तकाचा आकार डेमी अष्टपत्री. पृष्ट सं. ४८ प्र. पु. किं. ८ आणे.

एक रुपया प्रवेश फी भरणारास पाऊणपट किंमतींत पुस्तक मिळेल. एकदम सहा पुस्तकांची किं० प्र फी० सह ३। रुपये.

ग. अ. सराफ—नांदेड (निजामस्टेट)


---

ग्रा. क्र. २६७३
ग्रं. गोवा

# श्री संत मिराबाई.*

( संतकवि दासगणू विरचित. )

## आर्या [ गीति ]

रजपूत राजवंशीं झाली बाला मिरा शुची[1] धन्या
जी असुन मनुजदेहीं सर्वस्वीं नंद-सूनुला[2] मान्या

## २ दिंडी

महावैष्णव नृप उदेपुरीं झाला
दुजा वाटे जन्मास जनक आला
पार ज्याच्या वैभवाप्रती नाहीं
तया पोटीं जन्मल्या मिराबाई

## ३ श्लोक [ व० ति० ]

तन्वी[3] सुहास्यवदना रमणीयगात्रा
पाहूनि लज्जित जिच्या नलिनी[4] सुनेत्रा
गोरोचनापरिच वर्ण असे तनूचा
आकार येति धरुनी भ्रुकुटी धनूचा

## ४ ओवी

बाळपणापासून मिरासी घडे देवतार्चन
कृष्णीं संलग्न झालें मन विषय दूरी पळाले

याप्रमाणें मिराबाईला श्रीकृष्णभक्तीचें वेड बापापासून लागलें. तिच्याकरितां त्यानें, श्रीकृष्णाचें एक निराळेंच मंदिर बांधून दिलें. त्यांत राहून ती एकांतांत श्रीकृष्णाचें भक्तिभावानें भजन करी व त्यानें आपणावर सुप्रसन्न व्हावें ह्मणून त्याची पुढील भावानें करुणा भाकी:—

## ५ पद [ ता. केरवा. ]

अब कबसे मै ठाडी मेरे ठाकूर खेलो तुम होरी[5] ध्रु०
क्यों पकरी ये शाम! अबोलता[6]
मिठी मिठी बात मूंसे कहो गिरिधारी १
नहि माने तो अधरीं लगाके
बन्सी बजाव प्यारी अब कान्हा तोरी २

---

* भ. वि. अ. ३८, १ पवित्र. २. नंदाच्या मुलाला—कृष्णाला. ३. नाजूक शरीराची. ४. कमलिनी. ५. क्रीडाविशेष. ६. मौन.

मैं नहि राधा, मैं नहि गोपी
भोली भाली मिरा रजपूतकी छोरी ३
कभि नाहि छोडूं पय्यां तुह्मारे
गणु कहे वो तो भई जहागीर हमारी ४

एके दिवशीं अशा आनंदानें ती प्रभुपुढें नाचून भजन करीत असतां, तें तिच्य आईनें आइूा ऐकिलें. लागलींच, तिनें मुलीला दार उघडण्यास सांगितलें. दार उघडतांच पहात्ये तों मिराबाई प्रभुशीं प्रेमानें बोलत बसलेली. ती ह्मणत्येः—

## ६ पद [ चाल—लावणी. ]

बोलेल काय दगडाची मूर्ति या जगामधिं मिरा!
तूं सोड नाद गे! त्याचा घे करुनि सुरूप नोंवरा
त्यांतून स्त्रियांचा तुला
जन्म दीधला
ईश्वरें भला
मुळिंच परतंत्र हें आण मनीं मुलि! जरा

मिरा ( आईस ):—श्लोक [ व० ति० ]

मी मानवा जननि गे! वरणार नाहीं
ते मर्त्य, त्यांस झणिं भक्षिल काल पाहीं
नाहीं जरा मरण या जगदीश्वरातें
हा आवडे ह्मणुनि कांताचि मन्मनातें

## ८ पद [ चाल—गृहधंदा सारा० ]

आइ! लग्न नव्हे तें विघ्न भयंकर भारी
त्या नादिं बुडाल्या आजवरी नरनारी धृ०
कितिकांनिं सोडिल्या बंधू लग्न लावून
कितिकांनिं घेतले व्यर्थ स्त्रियांचे प्राण
किति तरुणपणामधिं विधवा होउनि बसल्या
किति जाच सोसेना ह्मणुनि जिवाला मुकल्या
ना सौख्य प्रपंचीं कांहीं पाहतां
मग कां ये घुसळूं डेरा हा रिता
येईल काय त्यापूनी वद हाता
धिःकार असो या जननि! जगीं संसारा
गणुदास ह्मणे साधका नको भव—वारा

१. मुलगी. २ नवरा. ३. स्त्रिया. ४. रिकामा. ५. त्यापासून.

एकूण संसार हा असा दुःखानें भरलेला आहे, तेव्हां आई! तूं मला लग्नाचा आग्रह करूं नकोस! मी लग्न न करितां ब्रह्मचारिणी राहणार आहे. आई! मागला इतिहास जर पाहिला तर—

### ९ श्लोक [ पृथ्वी० ]

नरापरिच राहिल्या जगतिं ब्रह्मचारी स्त्रिया
असें असुनि तूं वृथा धरिसि आग्रहा कासया?
मिळे न वरच्यावरी नर—तनू कुणाकारणें
तदीय उपयोग हा हरि—पदांबुजा सेवणें

### १० आर्या [ गीति. ]

आहे कथा पुराणीं श्रष्याश्रमिं गार्गि ब्रह्मचारीच—
राहिली, म्हणुनी तिजला विबुधांनीं काय मानिली नीच!

### ११ पद [ चा. नृपममता रामा० ]

तैसेंच आतां मी करित्यें हें ब्रह्मचर्य व्रत धरित्यें, माइगे! धृ०
तूं आणुं नको परि माते! मुळिं विघ्नाचि सत्कृत्यातें यापुढें
त्याविणें सफल हा नाहीं, जन्म तूं पाहिं स्मरूं दे प्रभुतें
या नंदतनय कृष्णातें माइगे!

### १२ ओवी

महिषी[4] सांगे भूपतीसी मिरा न करितसे लग्नासी
तुह्मींच विघडविलें तिशीं नाद लावून पूजेचा

### राजा ( राणीस ):—१३ दिंडी.

कुठें आली परि तिची लग्नवेळा
वर्ष चवदावें अजुनि तद्वयाला
जई येइल तारुण्यभरामाजीं
तई होइल करण्यास लग्न राजी

असें राजानें राणीचें समाधान केल्यानंतर ती स्तब्ध राहिली. पुढें कांहीं दिवस गेल्यावर एके दिवशीं पुष्कळसे बैरागी त्या गांवास भजन करीत आले.

### १४ पद [ ता. धुमाळी ]

कलिजुगमें ये भक्तिबिगर भाई! रामचरण नहि मिलते हैं
भक्तीके बडे शौकिन प्रभुजी भक्तनको नित चाहते हैं धृ०

१. योगिनी. २. सूज्ञांनीं. ३. कमी प्रतीची. ४. राणी.

जब आई वो शबरी बिचारी लेकर बनफल बदरीके
आगे तब रघुनाथ आदर करे पास बिठाई चरणोंके १

हनुमान् चढे अस्मान हातमो लेकर नगनृप द्रोणगिरी
बंदर होकर मान्य भये, ये रामचरणकी बलहारी ४

नृप सिंगासन बैठे बिभीखन, वाल्याके वाल्मीक भये
दासगणू कहे रामनामसे कबिर तुका वैकुंठ गये ३

ते बैरागी गांवांत भिक्षा मागूं लागले.

बैरागीः—१५ श्लोक [ भु. प्र. प्रमाणें ]

श्रीमंत वदमाषका मालपूवा
नहीं हमसे मंजूर रंडियोका मेवा
शुचि, प्रज्ञ, धर्मिष्ठ जो रामजीका
भगत होवेगा धाम बतलाव उसका

बैराग्यांचा हा सवाल ऐकून लोकांनीं त्यांना श्रीकृष्णमंदिरांत जाण्यास सांगितलें. त्याप्रमाणें सर्वजण मंदिरांत येऊन पाहतात तों मिराबाई देवापुढें प्रेमानें भजन करीत बसली आहे.

१६ पद [ ठुमरी ता. त्रिवट. ]

घर जानेदे जानेदे शाम मुरारी ! ध्रु०

सिरपर मटका नीर भरेला
कर छोडो अब तुम नंदलाला
रात भयी ये कठिण अंधेरी घ० १

तोरी सुरतमें जादू भारि है
बिन रस्सीसे बांध देति है
पद न वढत आगे कुंजबिहारी घ० २

डुबा दिया संसार किसनजी !
प्रीत लगाके नंदतनयजी
चरणकमल तोरे मै भयि भ्रमरी घ० ३

दासगणू कहे गोपगोपिका
भाग्य बडा भगवान उन्होंका
दास भया करे खालि थटोरी घ० ४

मिराबाईंचें हें ईश्वराविषयींचें प्रेम पाहून सर्व बैरागी तिला ह्मणालेः—

१. भिल्लीण. २. बोर. ३ पर्वतविशेष ४. बिभीषण. ५. वाल्याकोळी. ६. सुज्ञ, ७. धार्मिक ८. घर.

## १७ श्लोक [ इंद्रवज्रा. ]

बाई मिरा ! तूं बहु भाग्यशाली
झाला तुझा नंदकिशोर[1] वाली
जो प्राप्त ना योगि, जटी, तपीला
प्रेमेंच तो तूं झणिं आकळीला

मिराबाईनें त्या सर्वांना आसनें देऊन बसविलें व त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करविली. भोजनोत्तर ते सर्व पुनः प्रभुभजनांत दंग झाले. मिराबाईनें त्या बैराग्यांना श्रीकृष्णाचें भजन ह्मणण्यास सांगितलें.

बैरागीः— **१८ पद [ ता. धुमाळी. ]**

वेद पुकारत बडे आदबसे वो गोकुलमों खेल करे ध्रु०
पांगुलगाडा लेकर चालत जो पर्वतकू[2] अधर धरे १
ग्यानिमुनीको लाभ नहीं है पेंद्या उसका कर पकरे २
मान्यो रावण मान्यो पूतना वो बिल्लीसे शाम डरे ३
भक्तन खातर बाल भये प्रभू, उनकी इच्छा पूर्ण करे ४
दासगणू कहे ऐसो दयाघन हम पतितनको क्यों बिसरे ५

## १९ ओंवी.

वैराग्यासह साध्वी मिरा । नित्य आळवी जगदुद्धारा ।
त्यायोगें गांव सारा । निंदूं लागला तियेसी ।

लोक ( आपसांत ):— **२० पद [ चाल—लावणी ]**

जमवून चार ठोंब्यांना करी मिरा भजन मंदिरीं
याला न भक्ति ह्मणतां ये ही अनीति होत्ये खरी
परमार्थ तोच नेटका[3]
जिथें ना धक्का
बसतसे देखा
नीति विनयाला थोडाहि पहा अंतरीं १

## २१ श्लोक [ पृथ्वी. ]

उंसाजवळ बैसुनि मिटिल काय कोल्हा मुखा ?
त्यजी वृषभें[4] का कधीं हरितवर्णशा[5] बाटुका
कृशानु[6]वरि ठेविल्या सहज तूप तें पाघळे
तशीच तरुणासवें तरुणि ग्यास कामानलें[7]

---

१. कृष्ण २. गोवर्धन ३ उत्तम ४ बैल ५ हिरव्यागार ६. अग्नीवर ७ कामाग्नीनें.

अशी लोकांत मिराबाईसंबंधीं चर्चा चालून, शेवटीं कांहीं मानी रजपूत सरदारांनीं ती राजाच्या कानावर घातली व रजपूतांच्या कीर्तीला डाग लावणाऱ्या मिराबाईला जगांतून नाहींसें करावें, असा त्यांनीं बेत ठरविला. एके दिवशीं सर्व सरदारांनीं मिळून राजास ह्मटलें:—

## २२ पद [ झंपा ]

मिरा भूपते ! ठार वेगें करावी
आपली ती न कन्या ह्मणावी मि० धृ०
राज-वंशा तिनें लाविला कालिमा
काल[1]धामास ती पाठवावी
दुष्ट कुलटा घरीं, इक्षुलो साखरी
नाहिं वापा ! वरी, दूर धरावी मि० १

## २३ साकी

जन—निंदेनें शांत भूप परि तप्त होउनी गेला
चंद्रोदयिंच्या उदधीसम तो क्रोधभरातिनें भरला
विचार त्याठायीं किमपिहि उरला तो नाहीं

## २४ ओवी

खड्ग घेऊन निजकरीं . भूप पातला कृष्ण-मंदिरीं
वधायातें निज कुमारी केवळ लोकापवादास्तव

राजा आला त्यावेळीं मिराबाई सर्व वैराग्यांनिशीं श्रीकृष्णभजनांत रंगून गेली होती.

## २५ पद [ ता. धुमाळी. ]

अब लऊं बलय्यां तोरी रे ! नंदलालजी मोरे शाम ! धृ०
क्रूर पशू तमे बन्यो प्रभूजी ! सरूप साऱ्यो छोडीने
गुरगुर करिने दिधी आरोळी आपन भयो बेफाम १
जहर दिधो हतो भगत तमारो मेरी जवाना साटे
हलाहलकी सुधा किधी तमे, ऐसो तुम सुखधाम २
चरणकमलपर भ्रमर बन्यो जो तन मन अर्पण करिने
दासगणू कहे वो भये निर्भय, जद्‌लग मुखमो राम ३

## २६ पद [ ता. दीपचंदी. ]

बनी बैरागन मैं तो बैरागन धृ०

---

१ यमसदनास. २ उंसाला ३ समुद्राप्रमाणें. ४ तरवार. ५ नृसिंहावतारि. ६ विष. ७ प्रल्हाद. ८ जोंपर्यंत.

चरणोंके खातर तोरे प्रभूजी !
मत काटो अब मेरी मान व० १
राजाकी बेटी मैं उस्पर मिट्टी-
डाल दियी भगवान ! व० २
मै तन[1] तेरी समझ लियो ये
तूं मेरा पंचहि प्राण व० ३
दासगणू कहे बाई मिराका
गिरिधर राखे मान व० ४

आपल्या मुलीची निःसीम कृष्ण-भाक्ति पाहून राजा स्वगत ह्मणतोः—

२७ [ व. ति० ]

धिःकार हा आजि असो मम वर्तनास!
झालों प्रवृत्त दुहितेस[2] वधावयास !
लागो करास मम या झणिं आग रामा !
हे राघवा ! यदुपते ! प्रभु पूर्णकामा !

राजा मंदिरांत शिरला व मिराबाईला पोटाशीं धरून त्यानें तिला प्रेमानें कुरवाळलें. लोकांनीं उठविलेल्या दुर्वार्तेत यत्किंचित् सत्य नाहीं अशी त्याची खात्री झाली; परंतु आपण होऊन लोकापवादाला जागा देणें बरें नाहीं, ह्मणून तो तिला ह्मणतोः—

२८ पद [ चाल—हटातटानें० ]

" यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नाकरणीयं " असें
बोलिले जगद्गुरू[3] राजसे धृ०

यास्तव आचरिं जनरीतीला, योग्य मला हें दिसे
कथणें तुजसि नको फारसें

चाल— वाहिलें राघवें भय जनतेचें मनीं
लोकार्थ बैसलों आपण पट[4] नेसुनी
ह्या सर्वेहिं गोष्टी पाहीं मनिं शोधुनी

होइ मनानें बैरागिण तूं, हरकत माझी नसे
गणु ह्मणे फणस फळांताचि जसें १

आपल्या शीलाविषयीं बापाचें मन साशंक झालें आहे, असें मिराबाईनें त्याच्या भाषणावरून तात्काळच ताडलें; आणि त्यास निर्वाणीच्या शद्बांनीं ह्मटलें कीं,

१. शरीर २. मुलीला ३. श्रीमदाद्य शंकराचार्य ४ वस्त्र.

२९ पद [ चाल—ये धांवत कृष्णा० ]

काळिमा मदिय वर्तनें तुजसि जरि आतां
लागला असेल नृपनाथा ! ध्रु०
तरि टाक चिरुनि ही मान करि न अनुमाना
लागत्यें तुझ्या मी चरणा
जंत ही उदरि निपजती, ह्मणुनि का त्यांना
पोशिती कुणी नरभूषणा ?
त्यापरी कृमि[1]च मी समज, नको करूं चिंता
ह्मणुं नको मला ' निज दुहिता[2] ! १

मुलीचे हे निर्वाणीचे शब्द ऐकून राजाचें हृदय भरून आलें.

राजा ( मिरा ०स ):—३० पद [ चाल—पांडु नृपति ज० ]

हाय ! हाय ! काय वदसि ?
' मान चिरा ' सुखें ह्मणसि
मज वृद्धा दुःख देसि
वदुनि कटु वचा १
अंकीं[3] तुज खेळविलें
पाळुनियां वाढविलें
तें कां यासाठिं भलें
सांग कन्यके ! २

,, ,, ३१ श्लोक [ पृथ्वी ]

करि भजन मंदिरीं, परि नकोत कोणी इथें
पुरूष परके; कथूं तुजसि काय मी वर्म तें
तशांत नवयौवनें[4] त्वदिय देह शृंगारिला
ह्मणूनि पडदा[5] मुली ! उचित साच आहे तुला

मिरा ( राजास ):— ३२ आर्या [ गीति. ]

निज पति सन्निध असतां पडद्याचें काय काम नृपनाथा !
जनरीतिस यत्किंचित नाहीं त्यजणार ही तुझी दुहिता

मुलीच्या या भाषणानें तर राजा पुनः फारच साशंक झाला. हिचें लग्न तर अद्याप झालेंच नाहीं मग पति जवळ असतां पडद्याचें काय काम असें विचारते, याचा अर्थ काय ? हेंच त्याला उमजेना. त्यानें एकवार वैराग्याकडे दृष्टि देऊन पाहिलें व मिराबाईला विचारलें कीं, " पोरी तूं काय ह्मणत्येस ? या वैराग्यांत कुणी तुझा पति आहे काय ? " ती ह्मणाली बाबा ! होय या मंदिरांत माझा पति आहे. " राजा संतापून विचारतो कुलटे ? कोण तुझा पति आहे तो दाखव ! " तिनें शांतपणानें भगवान् श्रीकृष्णाच्या मूर्तीकडे बोट दाखवून बापास सांगितलें कीं, " बाबा ! "

१. किडा, जंत. २ आपली मुलगी. ३ मांडीवर. ४ तारुण्यानें. ५ पडद्याची चाल.

### ३३ पद [ ता. दीपचंदी ]

कांत[1] ये मेरो शाम कन्हय्या
मै तन मनसे भयी उन्की जाया[2] कां० ध्रु०
भाग्य बडो है तेरो पिताजी !
दुनियाका मालक जांवई मिलाया कां० १
खुबसूरतीसे पार न जिनके
आती[3] जैरा नहि कभि उनके ठाया कां० २
राजाके राजा नंदतनयजी
गणु कहे लछमी लागत पय्यां कां० ३

मिरा ( राजास ):—

### ३४ ओवी

हा कांत ऐसा अलोलिक[4] ज्याचा कदा न विरह देख
आंत, बाहेर व्यापक सर्व घटीं, सर्व ठायीं

राजा ( मिरा०स ):—

### ३५ दिंडी.

तवदिय असल्या हा कांत मिराबाई !
म्हणीं तांबुल तो करुनि त्यास देई
तोच तांबुल घेतल्या जगन्नाथें
तुझें म्हणणें वाटेल सत्य मातें

बापाचें भाषण ऐकुन लागलींच तिनें एक विडा तयार केला व तो प्रभूकडे करून करुणा भाकली कीं,

### ३६ पद [ चाल-बेर बन कैसें० ]

लेवो मोरे विडियां[5] मुकुंदा हरी ध्रु०
कबसे मै ठाडी ख्याल करो कछु
क्यों ऐसी तेढ धरी ? ले० १
ससरा तुम्हारा ये राजा इन्होनें
कौतुककी आस करी ले० २
ऐसा न होवे तो समझ कन्हय्या !
गणु कहे मीरा मरी ले० ३

### ३७ श्लोक [ मालिनी. ]

परिसुनि करुणा ती माधवें हास्य केलें
करुनि नजर काणी तांबुला भक्षियेलें
प्रमुदित[6] मन झालें, घे विडा नंद-सूनु
प्रगट तिज पुढारा जाहला ज्ञान[7]-भानु

१ नोवरा. २ स्त्री ३ ज्ञातारपण ४ अप्रतिम ५ विडा ६ संतुष्ट ७ ज्ञान—सूर्य.

विश्वभक्त जो अर्जुन त्यास 'ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्' असें अभिवचन देणारा श्रीकृष्ण परमात्मा प्रगट होऊन विडा घेतांच सर्व वैष्णवांनीं उठून भगवंताचा व श्रीमिराबाईचा मुक्तकंठानें जयजयकार केला.

## ३८ पद [ ता. केरवा. ]

जय बोलो भगवान की जय बोलो नंदलालकी  धु०
वखत आया था बहोत बुरा ये मिट्टीसे मिल जानेका
तब ठाकुरजी प्रगट भयीने, इज्जत राखी आम्माकी  १
जय गोपाला ! जय जगपाला ! जय नंदलाला ! जय हो जय !
भक्तपरेशा ! जय अविनाशा ! छीन करी पयपानी की  २
धन्य उदेपुर, धन्य भूप ये, धन्य मिराकी है विडिया
दासगणू कहे धन्य मिरा है भयि मय्या सब दुनिया की  ३

मुलीच्या भक्तिप्रभावानें व निष्कलंक वर्तनानें प्रभूचें साक्षात् दर्शन झालेलें पाहून राजा तिला ह्मणतोः—

## ३९ पद [ झंपा ]

मुली ! धन्य गे ! धन्य केलेंस मजला
भेटवीलें जगज्जीवनाला  मु०  धु०
जनक भूपाप्रती जानकी ती जशी
शोभली रुक्मिणी भीमकाला
सागरातें रमा, पर्वतातें उमा
तेविं झाली सिमा त्वद्गुणाला  मु०  १
राजवंशा तुवां भूषवीलें खरें
करुनि हरि-भक्ति ही पूर्ण विमला
'कन्यका' या मुखें ह्मणुं कसें तुजसि मी
योग्य तूं गे ! मजहि वंदण्याला  मु०  २

## ४० ओवी

पोटीं धरून मिराप्रति  आणवी आहेर भूपती
जामात जो का यदुपती  श्रीकृष्ण त्यांतें पूजावया

## ४१ कटाव.

चंदेरी मंदील जरीचा, बहुमोलाचा, वरि साजे तो कलगि-
तुऱ्याचा, अंगिं अंगरखा किनखापाचा, गळ्यांत कंठा
नवरत्नाचा, मौक्तिक वेंटी नानापरिची, प्रभा फांकली
चंद्रहाराची, रत्य करामधिं घातिलि पोंची, झाली गर्दि

१ वेळ २ निवड ३ दुधाचा व पाण्याची ४ जांवई ५ गुंडाळी.

कडीं-तोड्यांची, द्वय कर्णी चौकडे मनोहर, कर्णफुलें तीं खालीं
सुंदर, दिला नेसण्याप्रति पीतांबर, भरजरतारी शेला त्या-
वर पैठणींचा, गोदातटिंचा, येवल्याचा, शालु पुण्याचा
दोगोलाचा, मलमलींचा तो चंदेरी, धोतर जोडा तो नागपुरी
रेशिमकाठीं, करवत धाटी, असा पूजिला श्रीजगजेठी;
दासगणु ह्मणे प्रमोद पोटीं

मिराबाईविषयीं राजा निःशंक झाला परंतु इतरांना त्या चमत्काराची सत्यताच पटेना. त्यांचें आपसांत पुढीलप्रमाणें बोलणें चाललें.

### ४२ आर्या [ गीति. ]

आहे सुरानरांना अगम्य हें स्त्री-चरित्र उमगाया
व्यभिचारिणी मिरा परि, साध्वी तिज भूप मानितो वाया

### ४३ पद [ चाल-लावणी ]

आश्चर्य यांत तें काय खोट्यास भाव भूवरी ध्रु०
वनवास युधिष्ठिर भोगी खल सुखी हस्तिनापुरीं
वाढते जुई, मालती
तगर, शेवती
तिथें राहती
हिरण्या गार गणु ह्मणे शेर सावरी १

### ४४ अभंग.

केली कळीची मूर्ति तिनें जग ठकवाया कारणें १
काल ऐसें घडलें ह्मणे ' विडा घेतला मूर्तिनें ' २
आणि त्याच कौतुकाला पाहुनि राजा वेडा झाला ३
पहा जगीं न्याय कसा साध्वी ठरविली अवदसा ४

### ४५ श्लोक [ इंद्रवज्रा. ]

राऊळ ना हें स्मर—धाम साचें
वा विश्वविद्यालय दुर्नितीचें
अध्यापिका येथिल हो मिरा ती
कामार्त ते अध्ययनास येती

१. स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं ॥ देवो न जानाति कुतो मनुष्यः ॥ २ किंमत. ३ धर्मराज. ४ दुर्योधनादिक. ५ कर्कशा. ६ मंदिर, ७ कामदेवाचें घर, ८ शिकविणारी ९ कामानें पिडलेले.

## ४६ पद [ चाल—लावणी. ]

अवघेंच येथिचें कृत्य विलक्षण असें
बाहेर दिसे जें कांहीं, त्यापरी अंतरीं नसे ध्रु०
लोकांस गमे देव्हारिं कृष्ण मांडिला
परि खरें पाहुं गेल्यास, हरि-वेष मन्मथा[1] दिला १
भजनास 'गीतगोविंद[2] काव्य योजिलें
तें सार्थ पाहुनी सारें, अनुभव घेउनि सोडिलें २
रासांचे[3] पांच अध्याय पुराणाप्रती
स्तवनार्थ हरीच्या सारे, नित गोपि-गीत[4] घोकिती ३
काल्याचे पेवजि रास इथें मांडिती
त्यालाच अंधभक्तीनें हे खुळे भक्त मानिती

## ४७ श्लोक [ शा. वि. ]

कांचेचा तुकडा सतेज ह्मणुनी का मानणें त्या हिरा
घालूनी घण[5] त्यावरी निजकरें आधीं करावा चुरा
आहे योग्य बुधास; ना तरि खुळे त्या पाहुनी वर्तती
साम्यें[6] केवळ टाकुनी मृगमदा[7] ते मृत्तिका सेविती

## ४८ अभंग

| | | |
|---|---|---|
| साक्षात्काराचे प्रकार | झाले कलींत अपरंपार | १ |
| मूर्ति हालली वा चालली | मूर्ति घामाघूम झाली | २ |
| मूर्ति स्वप्नामाजी आली | मूर्ति स्वप्नांत बोलली | ३ |
| किंवा देवें कौल[8] दिला | देव अंगामाजी आला | ४ |
| करें काढणें भंडार | अथवा जान्हवीचें नीर | ५ |
| गणु ह्मणे पैशासाठीं | गारुडीच फिरतो हाटीं[9] | ६ |

## ४९ श्लोक [ शा. वि. ]

तांवांवांचुनि[10] नाकळे जगतिं या खोटें खरें कांचन[11]
झाला शंकर थोर तो जइं तयें केलें विष-प्राशन
प्रऱ्हादाप्रति मारितां न धजले अब्धी[12], असी[13], पावक[14]
मृत्यूचें भय त्या नसे मुळिं जया रक्षी रमानायक

---

१ मदनाला २ जयदेव कवि कृत ३ रासक्रीडेचे ४ भागवतांतर्गत ५ मोठा हतोडा. ६ सारख्या रंगामुळें. ७ कस्तुरीस ८ संमति ९ बाजारांत १० विस्तवावर तापल्यावांचून ११ सोनें १२ समुद्र १३ तलवार १४ अग्नि.

याप्रमाणें त्या रजपूतांच्या आपसांत मिराबाईविषयीं नानाप्रकारच्या कुटिल कल्पना चालू लागल्या. या सर्व गोष्टी राजाच्या कानांवर जात असत, पण त्यांवर त्याचा एकदम विश्वास बसेना. एकेदिवशीं तोच स्वतः वेष पालटून त्या रजपूतांच्या-कुटाळांच्या-मजलसींत जाऊन ऐकत बसला, तो पूर्वीप्रमाणें त्यांच्या गोष्टी झाल्यावर शेवटीं त्या लोकांच्या कल्पना पुढील थरापर्यंत गेलेल्या समजल्या.

लोक ( आपसांत ):— ५० आर्या [ गीति ]

सत्व मुलीचें घ्याया भूपतिनें विष तिला सुखें द्यावें
वा पेटवून अग्नी नेउनि निःशंक त्यांत लोटावें

५१ ओवी.

जंबुक-गर्जना[1] तोंवरी जोंवरी न आला केसरी[2]
अग्नीस पाहून माघारीं पळेल मिरा निःसंशय

५२ दिंडी.

खलांचा हा संवाद भूपतीनें
सर्व केलासे श्रवण गुप्ततेनें
चित्त झालें उद्विग्न त्यामुळें कीं
पथीं जातां तो श्वास उष्ण टाकी

त्या उद्विग्न स्थितींत राजाला वाटलें कीं,

५३ पद [ चाल—नको विवाहाची हा० ]

नको नको हा भूपपणा
जरि नच भ्यावें जन-निंदेला
तरि अंगीं ये मूर्खपणा न० ध्रु०
थोरपणा हा सुखद वाटतो
अनुभव घेतां दुःखद ठरतो
अंकुश-मारा गजचि साहतो
लघुपण नांदे सुखसदना न० १

या विचारानें राजा घरीं जाऊन सचिंत बसला असतां राणीनें चिंतेचें कारण काय ह्मणून विचारलें तेव्हां तो वैतागून ह्मणाला कीं,

५४ पद [ चा० वसंतीं बघुनि. ]

होतों वैरागी आतां
न तरि टाक तूं मारुनि आधीं सखये ! निज दुहिता ध्रु०
पसरली ऐसी जन-वार्ता
मिरा ठेविल्ये वैराग्यासी उपभोगाकरितां १

---

[1] कोल्हा. [2] सिंह.

तेणें तापचि मम चित्ता
जिकडे जावें तिकडे येती पेकूं या वार्ता २
झाल्या रोग महा हाता
गणु ह्मणे त्यासी युक्त छेदणें स्वप्राणाकरितां ३

'मूर्खलोकांच्या ह्मणण्याकडे लक्ष देऊन पोटच्या गोळ्याचा नाश काय ह्मणून करावा?' या राणीच्या ह्मणण्याला राजानें उत्तर दिलें कीं, "माझ्या प्रजेची असंतुष्टता व कुलांच्या राजघराण्यास लागणारा कलंक हींच या भयंकर कृत्यास भाग पाडणारीं कारणें आहेत." शेवटीं.

## ५५ ओवी.

भवति न भवति होऊन ठरलें करविणें विष-पान
बाई मिरालागुन जननीचिया हस्तानें

## ५६ आर्या-गीति.

शहरीं पुकार झाली आहे नृप करविणार विष-पान
आजाचि निज कन्येला, जाती न कसे बघूं तिचे प्राण

मंदिरांतच राजानें दरबार भरविला व सर्वांदेखत मिराबाईस विष देण्याचें ठरविलें.

## ५७ दिंडी

बसे सिंहासनिं भूप तया काला
पूर आलासे सिंग मंडळीला
पौरवासी जन मिश्रि अगरवाले
मौज बघण्या मंदिरा-प्रती आले

विषाचा प्याला हातांत घेऊन राजाच्या आज्ञेवरून राणीहि आली. पोटच्या पोरीला विषपान करविण्याचें काम आपल्याकडे आलें याबद्दल तिनें दैवास दोष देऊन मनांत परमेश्वराची करुणा भाकिली.

## ५८ पद [ चाल-अजि अक्रुर हा. ]

कशि पापिण मी जन्मा आल्यें रामा
मनमोहन मेघःशामा ध्रु०
वाहिलें जिला नउ महिने मीं पोटीं
तिजलागिं विषाची पोटीं-
देणें आलें नशिबाला
जननी नच विवशी तिजला
मी झाल्यें आज कृपाळा!
परि रक्षीं तूं सुखधामा! कृ० १

1 योग्य.

## ५९ श्लोक [ द्रुतविलंबित. ]

टकमकां खल ते विष पाहती      सुजन ते नयनीं जल गाळिती
परि मिरा मनिं निर्भय होउनी      विष पिण्याप्रति ये सरसावुनी

आईच्या हातांतील तो विषाचा प्याला निर्भयवृत्तीनें घेऊन मिरा ह्मणत्ये—

## ६० पद [ ता. केरवा. ]

* मै ना डरूं इससे मै ना डरूं      धृ०
कालिया जमुनाके अंदर भगा दिया
ये मै ना कभि विसरूं      १
तूं तो परात्पर हृदयमे मेरे
तुजबिन किससे स्मरूं      २
दासगणू कहे बाई मिराका
मूं से ये भजन करूं      ३

श्रीकृष्णाच्या मूर्तीपुढें उभी राहून मिराबाईनें देवाला बोलण्यास सुरवात केली.

## ६१ पद [ चाल-मजा देते हैं ]

अर्जी सुन लेना दिलदार मेरे लाल रे! एकबार      धृ०
रामनामकी अगाध शक्ति मै क्या मूंसे बोलूं
तोरे कृपासे प्रभुजी ! बंदर हो गये निधिके पार   रे! मेरे०   १
गोवर्धनको पतंग मुवाफिक अधर धरे बचपनमे।
छे महिनेकी रात बनायी ऐसो तुम अनिवार      रे! मेरे०   २
हालाहलकी सुधा करो अब अपने इज्जतखातर
मै बैठी हूं तोरे भरोंसे मत करना लाचार      रे! मेरे०   ३
दासगणू कहे इस दुनियामें निज भगतनको अपने-
विमल, सुखद, सब पापविनाशक चरनोंका आधार रे!   मेरे ४

याप्रमाणें मिराबाईनें देवास, ' प्रभुजी ? हें संकट माझ्यावर नसून तुमच्यावरच आहे, ' असें ह्मणतांच.

## ६२ श्लोक [ इंद्रवज्रा. ]

हालाहला त्या परमादरानें
सेवूनियां श्रीजगदीश्वरानें
देहीं मिराच्या अवतीर्ण झाला
रक्षावया तत्पर तो तियेला

* या प्रसंगाच्या खुद्द मिराबाईच्या ' पग घुंगरु बांधकर नाची रे० ' याहि सुंदर पदाची आठवण झाल्यावांचून राहत नाहीं.

### १३ दिंडी.

राय सामोरा जाय तयाकालीं सर्व घेउनियां पुत्र वीर्यशाली
पौर[1] नारीजन तसे बाल, वृद्ध पहायासी जाहले सर्व सिद्ध

### १४ आर्या [ गीति ]

वाजत गाजत जाती सर्व मिळोनी तयास आणाया
माझी बुद्धि न चाले त्या स्थितिचा सर्व थाट वर्णाया

### १५ श्लोक [ भु० प्र० ]

ऋषी नारदा पाहतां राय, पौर पुढें जाउनी आणिती त्यास शीघ्र
स्वसिंहासनीं तो नृपें[2] बैसवीला तयीं हर्ष-चित्तें नमस्कार केला

### १६–१७ दिंड्या

कनक-पात्रीं आणुनी तीर्थ[3] शुद्ध पद क्षाळी[4], यच्चित्त ना अशुद्ध
सर्व देहीं सौगंध चर्चियेला टिळा भाळीं केशरी रेखियेला
घेई नाना जातीय पुष्पमाला बहु प्रेमें अर्पीत नारदाला
तांबुलादिक नैवेद्य अर्पियेला अशा रीतीं विधि-पुत्र पूजियेला

### १८ श्लोक [ मालिनी ]

नृप[5]-तनय-कलत्रीं वंदिलें प्रेमभावें
ह्मणति मग तयातें, 'काय संतोषवावें'?
प्रभु-गुणरस भक्षी नित्य जो आवडीनें
स्तुति-रुचि उणि त्याला वाटते निश्चयानें

### १९ आर्या

प्रार्थुनि वदे तयाला ऋषिवर्या ! काय आस धरुनि मनीं—
येणें केलें सांगा मज दासा मुळिं न किंतु[6] ठेवोनी

### २० दिंडी.

नृपालाची जाणूनि विनय[7]भक्ति नारदातें जाहला हर्ष चित्तीं
ह्मणे भूपातें अन्य आस नाहीं प्रभुप्राप्तीची एक वासना ही

### २१–२२ श्लोक [ हरिणी. ]

" सहज फिरतां मृत्युलोकीं स्मरे तव ही पुरी[8]
बहु दिवस झाले पाहोनी तुला विमला हरी[9] !

---

१ नागरीक. २ त्यास सर्वांनीं. ३ पाणी. ४ धुतो. ५ रोहिदास आणि तारामती यांनीं. ६ संशय. ७ नम्रभाव. ८ अयोध्या. ९ हरिश्चंद्रा!

# नारदाची [illegible]

माळेच्या दुसऱ्या पुस्तकानंतर तिसरें पुस्तक जितक्या लौकर प्रसिद्ध झालें तितक्या लौकर प्रस्तुत पुस्तकहि प्रसिद्ध करावें, असा आमचा विचार होता. परंतु तिसऱ्या पुस्तकांतील हद्दतांत झटल्याप्रमाणें कायम ग्राहकांस दिलेल्या सवलतीचा फायदा ते करून घेतील अशा इच्छेनें आह्मीं आतांपर्यंत मार्गप्रतीक्षा केली. पण बाकीची वार्षिक वर्गणी हातची सोडून देण्यापेक्षां प्रत्येक वेळीं व्ही. पी. खर्च सोसण्यास आह्मी तयार आहों, हें दाखविण्याकरितांच कीं काय कित्येकांनीं मौन स्वीकारलेलें दिसून आलें. असो.

दुसरें आणि तिसरें अशीं दोन्हीं पुस्तकें थोड्याच अतरानें प्रसिद्ध झाल्याकारणानें नुसत्या प्रवेश फी भरणाऱ्या कित्येक ग्राहकांकडे तीं मिळूनच व्ही. पी. नें रवाना झालीं होतीं व त्या मागोमाग पत्रेंहि रवाना केलीं गेलीं होतीं. असें असतां कित्येकांनीं दुप्पट किंमत आकारलेली पाहून व्ही. पी. परत केली. या बाबतींतला नुकसानीचा अनुभव आंकड्यांनीं न दाखवितां तो ग्रंथप्रकाशकांना तर सामान्यतः येतोच असें समजून केवळ दिलगिरी प्रदर्शित करण्याशिवाय गत्यंतर नाहीं. तथापि, प्रसिद्ध झालेलें पुस्तक विकत न घेतां परत झाल्यास, कायम ग्राहकांतून नांव कमी केलें जाऊन आरंभीं भरलेल्या प्रवेशफीवरहि मग ग्राहकांचा कांहीं हक्क राहत नाहीं, या मालेच्या नियमाची त्यांना याठिकाणीं आगाऊच जाणीव दिल्यावांचून राहवत नाहीं. तरी प्रत्येकानें कृपाकरून याकडे लक्ष द्यावें.

प्रस्तुत पुस्तकांतील नूतन कवि श्री. केशव रामचंद्र देशपांडे यांचा परिचय मालेचे हितचिंतक रा. दामोदर लक्ष्मण कारेगांवकर यांनीं करून दिल्याबद्दल व मार्कंडेय आख्यान पाठवून पुढेंहि आश्वासन दिल्याबद्दल त्यांचे आह्मी आभारी आहों.

यांत आख्यानांची पानें ठरल्याप्रमाणें निरनिराळीं दिलीं आहेत; व तिसऱ्या पुस्तकांतील अधिक असलेलीं चार पानें त्यांत कळविल्याप्रमाणें कमीं केलीं आहेत.

जातांजातां आणखीहि एका गोष्टीचा उल्लेख केल्यावांचून आह्मांस राहवत नाहीं. '**निजाम विजय**' हें एकटेंच एक मराठी वर्तमानपत्र आमच्या इलाख्यांत निघत असल्यामुळें त्याविषयीं आमच्या मनांत अतोनात प्रेम व आदर आहे; परंतु त्याची फेड निजामविजयकारांनीं योग्य प्रकारानीं केली नाहीं, हें नमूद करण्यास आह्मांस फार वाईट वाटतें. निजाम

## १३ दिंडी.

राय सामोरा जाय तयाकाळीं सर्व घेउनियां पुत्र वीर्यशाली
पौर[1] नारीजन तसे बाल, वृद्ध पहायासी जाहले सर्व सिद्ध

## १४ आर्या [ गीति ]

वाजत गाजत जाती सर्व मिळोनी तयास आणाया
माझी बुद्धि न चाले त्या स्थितिचा सर्व थाट वर्णाया

## १५ श्लोक [ भु० प्र० ]

ऋषी नारदा पाहतां राय, पौर पुढें जाउनी आणिती त्यास शीघ्र
स्वसिंहासनीं तो नृपें बैसवीला तयीं हर्ष-चित्तें नमस्कार केला

## १६-१७ दिंड्या

कनक-पात्रीं आणुनी तोय[3] शुद्ध पद क्षाळी[4], यच्चित्त ना अशुद्ध
सर्व देहीं सौगंध चर्चियेला टिळा भाळीं केशरी रेखियेला
घेई नाना जातीय पुष्पमाला बहु प्रेमें अर्पीत नारदाला
तांबुलादिक नैवेद्य अर्पियेला अशा रीतीं विधि-पुत्र पूजियेला

## १८ श्लोक [ मालिनी ]

नृप-तनय-क[5]त्रीं वंदिलें प्रेमभावें
ह्मणति मग तयातें, ' काय संतोषवावें ' ?
प्रभु-गुणरस भक्षी नित्य जो आवडीनें
स्तुति-रुचि उणि त्याला वाटते निश्चयानें

## १९ आर्या

प्रार्थुनि वदे तयाला ऋषिवर्या ! काय आस धरुनि मनीं—
येणें केलें सांगा मज दासा मुळिं न किंतु[6] ठेवोनी

## २० दिंडी.

नृपालाची जाणूनि विनय[7]भक्ति नारदातें जाहला हर्ष चित्तीं
ह्मणे भूपातें अन्य आस नाहीं प्रभुप्राप्तीची एक वासना ही

## २१-२२ श्लोक [ हरिणी. ]

" सहज फिरतां मृत्युलोकीं स्मरे तव ही पुरी[8]
बहु दिवस झाले पाहोनी तुला विमला हरी[9] !

---

१ नागरीक. २ त्यास सर्वांनीं. ३ पाणी. ४ धुतो. ५ रोहिदास आणि तारामती यांनीं. ६ संशय. ७ नम्रभाव. ८ अयोध्या. ९ हरिश्चंद्रा !

ह्मणुनि तुजसी आलों पाहावया तव मंदिरीं
नयन भरुनी पाहीलें. जाउं दे! मज सत्वरी "
समजुत करी त्याची साची निघे मग तेथुनी
सुर-मुनि-सभेसी ये. राहे उभा अति हर्षुनी
कुशल पुसती त्यातें तेथें मुनी, सुर आदरें
विधि-सुतहि तें पाहोनी तैं वदे परमादरें

## २३–२४ श्लोक [ शिखरिणी ]

हरिश्चंद्राचे ते गुण सकल वर्णी स्वकवनीं
वसिष्ठा ऐकूनी परम सुख झालें तंव मनीं
सभेसी आनंदें ह्मणत, ' उपमा त्या दुजि नसे '
तदा विश्वामित्र प्रखरतर कोपें वदतसे
" सभेसी देवांच्या सकल गुणकीर्तीस कथितां
नये शंका चित्तीं, मजसि न बरें वाटत अतां
कुबेराची रंकां मुळिं न उपमा साजत जशी
हरिश्चंद्रालागीं स्तुति नच कदा शोभत तशी

विश्वामित्र ( नारदास ):—

## २५ दिंडी.

मृत्यु-लोकीं तो भूप करी वास — ईश-समुदायीं वर्णिसी कशास?
देव कोठें! तो मृत्यु-लोक कोठें? — वर्णितां मज आश्चर्य गमे मोठें!

## २६ ते २८ आर्या [ गीति. ]

ऐकुनि वसिष्ठ बोले केला कां व्यर्थ कोप मुनिराया!
सत्वगुणाचा पुतळा आहे कीं शांत तो असुनि राया[3]
परिसुनि विश्वामित्र क्रोधानें बोलला तया काय
" मी छळितां या सृष्टित कोण तरी रक्षुनी करी साह्य!
जो भक्तपोवळातें नच मी, झालाच भस्म तो समजा
नृप-सत्व हरण करुनी दाखवितों मी तुह्मां सुरांस मजा!"

## २९–३० दिंड्या.

वाद दोघांचा असा फार होतां — इंद्र बोले, बोलणें पुरे आतां
गोष्ट जाते ही विकोपा रिकामी — काय सांगूं सुज्ञहो तुह्मांला मी
परी नायकती तयाच्याहि बोला — सुरर्षीनीं धरियला मग अबोला
श्रमुनियां ते उभयतां बहु रागें — गमन करिती तैं निजाश्रमा वेगें

१ देवांच्या. २ भिकाऱ्याला. ३ राजा.

पत्नीप्रश्न परिसुनी भूप कथी स्वप्निंचा स्ववृत्तांत
ऐकुनि रोक्षी आणि, ह्मणारे जे भविष्य—कालांत

५० पद [ धुमाळी ]

तों गाधिज आला देखुनी नृप पुढती गेला ध्रु०
रायें विनयें नमिलें, त्यासी बोलत वचनाला
" स्वामी ! आजी शयनीं असतां पाहीं स्वप्नाला १
तुह्मासारखें रूप धरिलें द्विज ऐसा आला
राज्यदान मागतांच दिधलें बघुनि योग्यतेला २
औटभार वरि सुवर्ण मागे राज्य—दक्षिणेला
देतों ह्मणतां धरुनि अगेला मारी तो मजला ३
या स्वप्नाची फोड करूनी सांगा या काला"
रामसुतकवि चरित्र प्रेमें वर्णाया सजला ४

विश्वामित्र ( राजास ):—५१ श्लोक [ शिखरिणी ]

' हरि मी मागाया ' अउट तुक आलों तुज परी
घरीं मी ही इच्छा तुजजवळ येऊनि तिकरीं
जरी द्यावें वाटे तरि उदक सोडीं झडकरी
करी तेव्हां भूप प्रणति, उदका घालुनि करीं

' रुपा करून आपण राजधानींत या ह्मणजे तेथें औटभार सुवर्ण देतों ' असें हरिश्चंद्रानें ह्मटलें; तेव्हां,

५२ आर्या [ गीति ]

वाजत गाजत आले सर्वेहि ते नृपगृहास थाटानें
हर्षभरित नच झाला, ऐसा न दिसे कुणीच वाटेनें

५३ दिंडी.

निघे नृपति प्रासादिं तया कालीं उतरुनी ऋषि द्वारांत बसे खालीं
पुसति कारण त्या दूत तें नृपाचे वदे ' कारण नच आंत जावयाचें '

५४ आर्या [ गीति ]

नृप—सुत गेला मंदिरिं मागुनि ज़ातां पतिव्रता नारी
वेणी धरुनी गाधिज फरफर ओढूनि बहु तिला मारी

श्लोक ( कामदा. )

राय तो ह्मणे " राग का मुनी ? आणिलें तुह्मीं काय हें मनीं ?
कामना असे काय ती कळो आणि विघ्न हें सर्वही टळो."

१ तारामती. २ हट्टानें. ३ प्रणाम. ४ राजवाड्यांत.

५६–५७ श्लोक ( शिखरिणी. )

" जरी माझ्या हातें नकळत असा मंतु घडला
दयालेशें दासावरि ऋषिवरा ! सांप्रत वळा
जरी ना हें माने मजचि तरि मारा, न अवला
कदा होती तीतें सहन न अशा ताडन-शिला "
नृपालाची वाणी परिसुनि अशी तो मुनिवर
बहू रागें झाला प्रखरतर पृथ्वीपतिवर
तया कोपें बोले, ' तुजसि किमपी लाजचि नसे
न देतां संकल्पा सदनिं शिरतां कां मग असे

५८ ते ६० आर्या [ गीति. ]

रायें भांडारांतुनि तेव्हां सौवर्णभार आणविला
देऊं जातां त्यातें, झिडकारी तो ह्मणूनि परतविला
साशंकित नृप होउनि वदे तयाला, तपोनिधान मुनी !
द्या लक्ष दीन बालक आहे प्रार्थित बहुविधा नमुनी
तों ऋषि कोपोनि ह्मणे, ' मूढा ! तूं राज्य-दान दिधलें हें
' देउनि मागें घ्यावें ' लक्षण धर्मात कोणत्या आहे ! "

विश्वामित्र ( राजास ):— ६१–६२ श्लोक [ ललित. ]

घेति दान जे उलट मागुती पूर्वजांसवें नरकिं राहती
अंतकाळिं त्या यमहि जाचितो ' फेड पाप तें ' ह्मणुनि मारितो

हें ऋषीचें भाषण ऐकून राजा,

सेवका वदे, " वदति जें मुनी सत्य तें असें पटत मन्मनीं
आस ना धरा नृपतिची बरें " बोलुनी असें स्वगुरुतें स्मरे

६३ ते ७३ आर्या [ गीति. ]

ऐकुनि वच मुनि मारित, त्यास ह्मणे ' दान देइं कनकाचें
तेव्हां टकमक बघती जन, वदनातें द्विसृष्टि-जनकाचें
मारित मारित बांधी स्तंभीं राजास दोरखंडानें
जणुं इक्षुदंड कवळी बहुबलहस्ति प्रचंड शुंडानें
अवलोकुनि कृत्यातें वाटे आश्चर्य राजभृत्यातें
तैसेंच सज्जनातें, शत्रूतें, अन्य वैरधान्यातें
अति दुःखद दुर्वार्ता कळविलि युवराजयास दूतांनीं
कीं ' गाधिज आवळुनी बांधी राजास दोरखंडांनीं '

१ अपराध २ स्त्री–तारामती ३ हरिश्चंद्रावर ४ वसिष्ठातें ५ प्रतिसृष्टि निर्माण करणाऱ्या विश्वामित्राच्या ६ ऊंस ७ सोंडेनें.

पत्नीप्रश्न परिसुनी भूप कथी स्वप्निंचा स्ववृत्तांत
ऐकुनि राज्ञी जाणे, होणारें जें भविष्य—कालांत

### ५० पद [ धुमाळी ]

तों गाधिज आला देखुनी नृप पुढती गेला ध्रु०
रायें विनयें नमिलें, त्यासी बोलत वचनाला
" स्वामी ! आजी शयनीं असतां पाहीं स्वप्नाला १
तुह्मासारखें रूप धरिलें द्विज ऐसा आला
राज्यदान मागतांच दिधलें बघुनि योग्यतेला २
औटभार वरि सुवर्ण मागे राज्य—दक्षिणेला
देतों ह्मणतां धरुनि अंगला मारी तो मजला ३
या स्वप्नाची फोड करूनी सांगा या काला "
राम्रसुतकवि चरित्र प्रेमें वर्णाया सजला ४

विश्वामित्र ( राजास ):—५१ श्लोक [ शिखरिणी ]

' हरि मी मागाया ' अउट तुक आलों तुज परी
धरीं मी ही इच्छा तुजजवळ येऊनि निकरीं
जरी द्यावें वाटे तरि उदक सोडीं झडकरी
करी तेव्हां भूप प्रणति, उदका घालुनि करीं

' कृपा करून आपण राजधानींत या ह्मणजे तेथें औटभार सुवर्ण देतों ' असें हरिश्चंद्रानें ह्मटलें; तेव्हां,

### ५२ आर्या [ गीति ]

वाजत गाजत आले सर्वहि ते नृपगृहास थाटानें
हर्षभरित नच झाला, ऐसा न दिसे कुणीच वाटेनें

### ५३ दिंडी.

निघे नृपति प्रासादिं तया कालीं उतरुनी ऋषि द्वारांत बसे खालीं
पुसति कारण त्या दूत तैं नृपाचे वदे ' कारण नच आंत जावयाचें '

### ५४ आर्या [ गीति ]

नृप—सुत गेला मंदिरिं मागुनि जातां पतिव्रता नारी
वेणी धरुनी गाधिज फरफर ओढूनि बहु तिला मारी

### श्लोक ( कामदा. )

राय तो ह्मणे " राग का मुनी ? आणिलें तुह्मीं काय हें मनीं ?
कामना असे काय ती कळो आणि विघ्न हें सर्वही टळो."

१ तारामती. २ हटानें. ३ प्रणाम. ४ राजवाड्यांत.

## ५६–५७ श्लोक ( शिखरिणी. )

" जरी माझ्या हातें नकळत असा मंतु घडला
दयालेशें दासावरि ऋषिवरा ! सांप्रत वळा
जरी ना हें माने मजचि तरि मारा, न अबला
कदा होती तीतें सहन न अशा ताडन-शिला "
नृपालाची वाणी परिसुनि अशी तो मुनिवर
बहू रागें झाला प्रखरतर पृथ्वीपतिवर
तया कोपें बोले, ' तुजसि किमपी लाजचि नसे
न देतां संकल्पा सदनिं शिरतां कां मग असे

## ५८ ते ६० आर्या [ गीति. ]

रायें भांडारांतुनि तेव्हां सौवर्णभार आणविला
देऊं जातां त्यातें, झिडकारी तो ह्मणूनि परतविला
साशंकित नृप होउनि वदे तयाला, तपोनिधान मुनी !
द्या लक्ष दीन बालक आहे प्रार्थित बहूविधा नमुनी
तों ऋषि कोपोनि ह्मणे, ' मूढा ! तूं राज्य-दान दिधलें हें
' देउनि मागें घ्यावें ' लक्षण धर्मांत कोणत्या आहे ! "

विश्वामित्र ( राजास ):—

## ६१–६२ श्लोक [ ललित. ]

घेति दान जे उलट मागुती पूर्वजांसवें नरकिं राहती
अंतकाळिं त्या यमहि जाचितो ' फेड पाप तें ' ह्मणुनि मारितो
हें ऋषीचें भाषण ऐकून राजा,
सेवका वदे, " वदति जें मुनी सत्य तें असें पटत मन्मनीं
आस ना धरा नृपतिची बरें " बोलुनी असें स्वगुरुतें स्मरे

## ६३ ते ७३ आर्या [ गीति. ]

ऐकुनि वच मुनि मारित, त्यास ह्मणे ' दान देइं कनकाचें
तेव्हां टकमक बघती जन, वदनातें द्विसृष्टि-जनकाचें
मारित मारित बांधी स्तंभीं राजास दोरखंडानें
जणुं इक्षुदंड कवटी बहुबलहस्ति प्रचंड शुंडानें
अवलोकुनि कृत्यातें वाटे आश्चर्य राजभृत्यातें
तैसेंच सज्जनातें, शत्रूतें, अन्य वैरधाऱ्यातें
अति दुःखद दुर्वार्ता कळविलि युवराजयास दूतांनीं
कीं ' गाधिज आवळुनी बांधी राजास दोरखंडांनीं '

१ अपराध २ स्त्री–तारामती ३ हरिश्चंद्रावर ४ वसिष्ठातें ५ प्रतिसृष्टि निर्माण करणाऱ्या विश्वामित्राच्या ६ ऊंस ७ सोंडेनें.

भूपतनय शिरुनि मधें ठेवी गाधिज-पदिं स्वशिरकमला
विनयें ऋषीस विनवी " दोष असा कवण नृपकरें घडला ? '
तेव्हां विश्वामित्रें पुशिलें रायास ' कोण हा सांग ? '
नृप उत्तर दे त्यातें ' मम सुत कीं हा गुणी असे चांग '
' लवकरि शापा आह्मां परि सोडा या तुह्मी नृपाळाला '
जन-वाणी परिसुनि ही, मुनि बोले, ' सोडणार नच त्याला '
मग विनवी नृप-सुत, ' मी तुमच्यापाशीं गहाण राहीन
परि जनकाचें ऋण हें फेडुनि उत्तीर्ण पूर्ण होईन '
हरि नृप मग काय वदे, " अवधि मला हे मुनींद्र ! द्या मास
वेळ चुकेल जरी ती शापुनि जावें तुह्मी तदा खास
चंचल मन नच माझें, होई तैसें कुमार, पत्नीचें "
द्रव येउनि ऋषि बोले, ' वचन कदापि न तुझें चळो साचें '
हें कृत्य पाहुनी जन हळहळती तेधवां मनामाजी
नृप बोले, ' येतों जा गृहासि; पुरवूनि कामना माझी '

## ७४ श्लोक [ शिखरिणी. ]

मुनीच्या पादातें नमुनि सुतकांतेसह तदा
निघाला सोडोनी नगर, जन, सिंहासन-पदा
पशू-नेत्रीं अश्रू गळति, गगनीं कोकिल-थवे
गुणा गाती, भूपाप्रति वदुनियां मंजुलरवें

हे त्रिवर्ग अंगावरील दागिन्यांसह बाहेर पडले असतां पुन्हां मुनीनें आडविलें, तेव्हां

## ७५ ते ७७ दिंडी.

देइ काढुनियां अलंकार त्यातें
वस्त्र आवश्यक ह्मणुनि घेतसे तें
' दयाळू हा मुळिं हृदयिं कसा नाहीं
लोक-वाणी त्या समयिं बोलली ही
काननाची मग वाट धरुनि वेगें
ह्मणे पत्नीसी कसें करावें गे !
कवण मार्गें जाऊंत सुखें आतां
येरु वदली ह्या धरूं भयद-पंथा
वदे मुनि, ' मित्रा ! फार ताप द्यावे
तसे वरुणा ! तूं कूप आटवावे
वारिबिंदुहि ठेवूं नकोस कोठें
तसे ऐकति ते, हेंच नवल मोठें

## ७८ ते ९१ आर्या [ गीति ]

पुत्र ह्मणे, ' जी ताता ! आतां मरतोंच मी जलावीण '
उत्तर तदा पिता दे, बैस, जला मी क्षणैक आणीन '
ऐसें समजावुनियां शोधाया काननीं निघे अंबु
जातां स्वमनीं चिंती, ' जें काय करील तें करो शंभु ! '

भूपति शोधुनि आला पाणी कोठें दिसे न बिंदुभरी
होउनि निराश पडती पुत्रकलत्रहि तसेच धरणिवरी
राजानें त्या दोघांना वारा घालून सावध केलें व ते तिघे पुढें चालूं लागले.
तों ब्राह्मणरूपातें घेउनि आला ऋषी छल कराया
खोकत, कांपत, टेंकित काठी कीं व्यापिली जरें काया
रायें पाहुनि त्यातें केलें सद्भक्तिनें पदीं नमन
विप्र ह्मणे मनिं, " इतका छल केला, दुष्ट होय परि न मन
आतां युक्ति कशी ती योजावी सत्व तें हराया स "
ऐसें चिंतित असतां, आली शंका त्वरेंच रायास
प्रार्थुनि ह्मणे तयातें, ' सांगा स्वामी ! मनांतलें कोड '
येरु वदे, ' अत्युष्णें चटके बसुनी पदीं उठति फोड
तूं भेटलास मातें आतां माझ्याच दैवयोगानें
द्यावीं पादत्राणें, होइल तुज सौख्य त्याहि योगानें '
' सत्यव्रता स्मरुनियां दिधलें मीं सर्व राज्यदान जर
तरि या पादत्राणीं फिरली कशि एवढी वदा नजर ?
ज्यापरि सुराज्यनीतिंत वर्णन केला असे सु-दानविधि
त्यापरि वागत आलों मी, मज खोटें ह्मणे कदा न विधी
न रणाला जो भ्याला, तो भीतो काय ऊष्ण किरणांला
हरणाला भी न जसा व्याघ्र, तसा तो सुसाधु मरणाला
जरि मानिति मनिं सुख तें खरें न परि अन्य भाव दावीती
धन्यचि नृप, पुत्र सती धन्या ! किति धन्यता वदावी ती
नृपति वदे पुत्राला, ' वदन तुझें खिन्न होत कां वद रे !
मनिं गुप्त न ठेवीं तूं. ' ह्मणुनी अश्रू पुशी स्वतां पदरें
बालक बोले तेव्हां, ' बाबा ! मी भीत नाहिं मरणातें
खेद मनीं वाटे कीं, फेडूं न शके तया ऋणींणातें

## ९२-९३ श्लोक [ द्रुतविलंबित ]

किति उदात्त विचार तुझा असे मम मुला ! किति बोलसि गोडसें
तव मुखांतिल या वचनामृतें परिसुनी मजला सुख वाटतें
विसरती श्रम ते पथिं चालती रुतति कंटकही पदिं खालती
रविकरें[1] उठती प्रखर ज्वल[2] जणुं गमे शितिकंठ[3]—हलाहल

## ९४ ते १०१ आर्या [ गीति ]

विश्वामित्रें पुढतीं मायामय निर्मिलीं वनें धामें
आणावयास जीवन[4] जाई तेथें हरी अति प्रेमें

१ कादे. २ ज्वाळा. ३ महादेव. ४ पाणी.

जाउनि जवळ तयाला बोले घे ह्या सुगंधित पयाला
मार्गश्रम शमनाला न धरीं संकोच याहि समयाला
त्यातें भूपति सांगे, ‘ योग्य न हें कर्म मज मुनिश्रेष्ठा!
सत्व न कदापि सोडीं जरि आतां पावलों अशा कष्टा ’
राज्ञीस वदे तो ऋषि, “ बहु तूं श्रमलीस मार्ग चालुनियां
या उदका घे ’ ह्मणतां, मुरडुनि चाले पतीस पाहुनियां
मागुनि आला नृप—सुत पाहुनि धांवे ऋषी तयाजवळी
कडिये घेउनि त्याच्या बाह्य प्रेमें मुखास कुरवाळी
“ हे मृद्वंगा[1] बाला! किति सुकलें वदन ऊष्ण तापानें
मार्ग—श्रम होउनि तूं श्रमसि सुखें शांत होईं जलपानें ”
मुनिवर्य—वचन ऐसें परिसुनि, बालक तयास काय वदे
‘ प्राशुनि धर्मजलातें काय रविकुलास डाग लागूं दे? ’
सत्वहरण होईना, कोपुनियां अग्नि चहुंकडे लावी
ती अत्यंत भयप्रद करुणकथा यापुढेंच परिसावी

नंतर विश्वामित्रानें त्यांची चुकामूक होण्याकरितां चोंहींकडे अग्नि पेटविला. थोड्याच वेळांत त्या तिघांची चुकामूक झाली. त्यावेळीं ती तारामती—

## १०२–१०३ श्लोक [ भु. प्र. ]

पुढें पाहत्ये आपुल्या जों पतीतें — परी तो दिसे ना कुठेंही सतीतें
सुलातें बघायास मागें फिरोनी— — पहात्ये परी तोहि गेला चुकोनी
स्तनातें असे सूटला दुग्ध-पान्हा — कुठें गुंतला खेळण्या बाळ तान्हा
क्षणीं येई माझ्या सख्या बासरा रे! — कसे चालला सोडुनी आज सारे!

## १०४ पद [ चाल—लक्ष्मण पडतां ध० ]

कैसें सोडुनि मज नाथा! — वाटलें जावें तरि आतां? धृ०
त्यजुनी या प्रिय पत्नीला — जाण्या कोप कसा आला?
भव-पुरिं लोटुनियां मजला — कां तरि परलोकीं गेला?
गायीपरि दीना कांता — वाटलें० १
वनिं या त्यजुनि एकटीला — विसर कसा तरि आवडला
देउनि भेट वदा मजला — कोण मम दोष असे घडला
अग्नींत अर्पिन तनु आतां — वाटलें० २
प्रियपति आणि मम बाळ — कोठें असती वेल्हाळ?
कुणा जरि दिसले असतील — सांगा त्वरित कृपाशील!
ऐसा शोक करी कांता — वाटलें० ३

1 कोमलांगा.

## १०५-१०६ श्लोक [ स्वागता. ]

पूर्ण निश्चय करी नृपपत्नी प्रार्थिला त्रिपद तो बहु यत्नीं
टाकला त्वरित तो द्वयशीर्ष पावली तंव सती अति हर्ष
टाकण्यास उडि तत्पर झाली चिंतुनि स्वपति सद्गुणशाली
ओळखे स्थिति अशी मुनि तेथ अंतरीं गुण तिचे बहु गात

## १०७-१०८ आर्या [ गीति. ]

जाउनि समीप कौशिक काय विचारी तदा तया सतिला
' कां अग्निकाष्ठा भक्षण करिसी तूं, गमत काय तव मति ला ? '
" माझ्या नाथसुतातें नेतां या अग्निरूप काळानें
सांगितलें मज, ' तूं ये स्वपतिबरोबर, ' तया कृपाळानें "
येरु वदे तिजलागीं, ' मज आढळलीं वनीं द्वय प्रेतें '
परिसुनि बसती चटके राज्ञी-मनिं त्या अघोर वृत्तांतें
तीतें सवेंच सांगे, ' जरि तूं येशील मजसवें आतां
दाविन निःसंशय तुज; न करीं तूं मनिं कदापिही चिंता '

नंतर त्यानें तिला उभयतांचीं प्रेतें दाखविलीं; तेव्हां,

दुःखें होरपळोनी लोळे क्षितिवरि, जसा पहा मीन !
दुःस्थिति हृदयविदारक वर्णू तरि येथ ती शके मी न !

तो समय रात्रीचा होता. प्रातःकाळीं प्रेतांस अग्नि देण्याकरितां सांगून विश्वामित्र गुप्त झाला. नंतर थोड्याच अवकाशांत,

## ११२ ते ११४ श्लोक [ कामदा ]

प्रगट तो मुनी होय तेधवां व्याघ्ररूप तें घेउनी, शवा—
फाडुनी मुखीं घालि आंतडीं सर्व कृत्य तें पाहि बापुडी
" धांव धांव गा ! श्री रमापती ? जाहली कशी प्राप्त ही गती
वैरियां अशी होउं ना कधीं हेंच मागणें भो कृपानिधी !
व्याघ्र सोडिना सर्वथा मला मृत्यु ना सुटे, देह जन्मला—
जों न तें फिटे जन्मि या ऋण मी तरी दुजे जन्मि फेडिन

असें ह्मणून व्याघ्रमुखांत आपणहि भक्ष्य होण्याकरितां ती तयार झाली तोंच विश्वामित्रानें त्या प्रेतांत प्राण सोडून जिवंत केलें. त्रिवर्गांची भेट झाल्यावर आनंदानें ते काशीचा मार्ग आक्रमूं लागले.

---

१ अग्नि.

## ११५ श्लोक [ शिखरिणी ]

पुढें जातां जातां बघत सुत-कांतेसह हरी
चिदानंदा दे जी बहु विमल काशी अघ-हरी
जिथें इच्छा ठेवी अमरगण तेसा बुधजन—
मरावें जन्मावें म्हणुन, इतरां पाड कवण ?

विश्वनाथाचें दर्शन घेतात न घेतात तोंच विश्वामित्रानें औटभार सुवर्ण दक्षिणे-करितां त्यांचा पिच्छा पुरविला; तेव्हां स्वतःला विकून सूर्यास्तापर्यंत ऋणांतून मुक्त होण्याचें हरिश्चंद्रानें वचन दिलें; आणि मला कुणी विकत घ्या असें म्हणत तो बाजारांतून फिरूं लागला.

## ११६ दिंडी.

लोक ऐकुनियां भूप-शब्द कानीं पाहुं येती ही काय असे वाणी !
दुःख झालें तेधवां सर्व लोकां ' हाय ! ' ऐसें बोलती एकमेकां

' माझा देह विका ' असा तारामतीनें आग्रह धरिला तेव्हां तें पाहून,

## ११७ ते ११९ आर्या [ गीति ]

मग रोहिदास बोले, ' ताता ! मम देह आधिं जाऊं दे
यांतच वाटे सुख मज म्हणुनी करितों विनंति बहु मोदें '
परिसुनि सुत-वच विप्रहि बहु हर्षें वदत काय भूपातें
" मज एक युक्ति सुचते ऐकासि तरि तीहि सांगतों तूंतें
राणीचें तुक एकचि, बाळाचें अर्ध तुक जरी येई
त्वद्देहा तुक दोनचि, मिळुनि ते औट या द्विजा देई

## १२० दिंडी.

वदे राज्ञी, ' हे प्रिया प्राणनाथा ! प्रथम काया मम विका तुह्मी आतां
उणें येतां मग विका स्वपुत्रातें तें न पुरलें तरि विका स्वदेहातें

गांवांतील ग्राहक जमा झाले. कौशिकानें स्वतः तारामतीस विकत घेतलें व माय-लेंकरांची ताटातूट करून तो तिला घेऊन जाऊं लागला तेव्हां,

## १२१ श्लोक [ भु. प्र. ]

वदे वाक्य राज्ञी मुनीलागिं काय विसंबूं शकेना सुतालागिं माय
विनंती अशी आयकावी दयाळा ! तुह्मीं मायलेकास द्यावें कृपाळा !

विश्वामित्रानें तिच्या विनंतीस मान देऊन रोहिदासासहि विकत घेतलें. डोंबानें हरिश्चंद्रास विकत घेतलें. याप्रमाणें हरिश्चंद्र विश्वामित्राच्या ऋणांतून मुक्त झाला. नंतर तो डोंबराज,

१२२ पद [ चाल—हरिनारायण जग तात ]

नृपतीला घेउनि जाय करि काय देव न समजे ! ध्रु०

डोंब—धामिं पाण्यासाठीं
ठेवियलें त्या नृपतीसी
घरिं काम सांगती त्यासी करि० १

नृप कुंभ करिं घेवोनी
आणि गंगेचें पाणी
मुनि येउनियां करि करणी करि० २

मुनि त्यास जल आणितां
मारि दगड तत्वतां
तो लागे राया हातां करि० ३

घट पडे, फुटे तैं खालीं
आरंभीं ही गति झाली
पाहुनियां लाथा घाली करि० ४

घट त्यास दुसरा देतां
' जरि फोडिशील हा आतां
तरि जीव घेइन परता करि० ५

परि नाहीं छळ सोडियला
तळिं रांजण तो फोडियला
जल घाली तैं घडिघडिला करि० ६

श्रम घडतां होय भुकेला
नृप मागायासी गेला
कांहीं दे त्या खायाला करि० ७

शिधा त्यास किंचित दिधला
घेउनि गंगेला गेला
करि शुद्ध त्या अन्नाला करि० ८

स्नान करुनि पाकहि केला
मग भोजनास तो बसला
तों घेउनियां वेषाला करि० ९

मुनि वृद्धरूपें आला
धरि दावि क्षुधा पोटाला
नृप अन्नहि अर्पी त्याला करि० १०

जल पिउनि पोटासाठीं
धनिकामीं आवड मोठी
विनवि रामसुत जगजेठी ! निजधामीं अंतीं नेई ११

## १२३ ते १२८ दिंडी

काम होईना ह्मणुनि ठेविघेला
नांव आहे कीं मसणखांब ज्याला
ममाज्ञेविण जाळूं न शवा द्यावें'
तदाज्ञेपरि नृप काम करी भावें

इकडे तारामती आणि रोहिदास यांचें वर्तमान असें झालें कीं, एकदां

अब्ज आणाया रोहिदास यातें
पाठवीलें कौशिकें अरण्यातें
तोहि हर्षें बोलावितो गड्यातें
सवें घेउनियां जाय खेळण्यातें
तदा गाधिज आज्ञापितसे नागा
रोहिदासातें दंश करीं जा ! गा !
वंद्य आज्ञा मानून नाग वेगीं
बसे जाउनि त्याक्षणीं कमलभागीं
पारिजातक, केतकी, सूर्यकांत
तुळशि, दवणा, सेवती, विष्णुकांत
बिल्व, कांचो त्यापरी मोगऱ्यांना
बाळ पुष्पें तोडितो तिथें नाना
पुढें कमलांस्तव पल्वलांत जाई
बहुत कमलें तोडितां करी घाई
पन्नगाब्जा शेवटीं तोडण्याला
घालितां कर तों दंशि उरग बाला
बाल मूर्छित होऊन पडे खालीं
प्राण देहांतुनि जाय तया कालीं
देह पडतां निष्प्राण बालकाचा
पळाला तैं गण सर्व सोबत्यांचा

सोबत्यांनीं येऊन तारामतीस सांगितलें, त्यावेळीं ती ब्राह्मणास अन्न वाढीत होती. रोहिदासाचें वर्तमान ऐकतांच ती संकटांत पडली पण ब्राह्मण जेवत असतां तिला तेथून हलतां येईना. त्याचें भोजन होतांक्षणींच

## १२९ ते १३२ दिंडी.

तशीच आली ती पुष्पवनामाजी
पुत्रवदना उत्सूक पहाया जी
वृक्ष सारे शोधिले त्या क्षणांत
तिजसि दिसलें तैं प्रेत अकस्मात
प्रेत पाहुनियां ह्मणे हे कुमार ?
टाकुनी कां गेलास निराधार
अरे माझ्या तान्हुल्या दुग्ध-पान्हा
पिउनि तरि तूं जा पुढें निजस्थाना
आस होती ती काय तुझी मातें
सौख्यदायी होशील माउलीतें
मनोराज्यातें मारिलीस लाथ
काय आतां मी करूं सांग येथ

तितक्यांत मुनीनें अन्य वेषानें येऊन तिला सूर्योदयाच्या आंत प्रेत जाळण्यास सांगितलें. त्याप्रमाणें ती तारामती.

दहन करण्यातें रची सर्पणातें
प्रेत ठेवुनियां लावि अग्नि त्यातें
निघति ज्वाला त्यांतून अतोनात
पडे त्यायोगें तेज अरण्यांत

तें तिचें कृत्य मसणखांबास दिसतांच त्यानें तावडतोब सरण विझवून प्रेत बाजूस काढलें; व मालकाच्या परवानगीशिवाय प्रेत जाळतां येणार नाहीं, असें स्पष्ट बजाविलें; नंतर ती तें प्रेत घेऊन जवळच्या देवालयांत सचिंत बसली असतां तिचा डोळा लागलेला पाहून मुनीनें

१ कमल. २ साप. ३ तळ्यांत. ४ साप असलेल्या कमळास.

त्या प्रेताचीं आंतडीं काढून तारामतीच्या तोंडांत घातलीं व नागरिकांस 'लाव आली' असें तो सांगत सुटला. डोंबास तें वर्तमान समजतांच त्यानें आपल्या सेवकाला-हरिश्चंद्राला-आज्ञा केली कीं, तूं या स्त्रीला मारून टाक. धन्याची आज्ञा पालन करण्यास हरिश्चंद्र उठला. त्यावेळीं,

## १३३-१३४ दिंडी.

विचारी तो तिज डोंब दुष्ट मांग
"काय इच्छा शेवटीं तुझी सांग?
काळसदनीं मी तुला पाठवीतों
बोल शेवटचे बोल, वेळ होतो।"
"असा जन्मोजन्मीं पती मिळावा !
रोहिदासापरि पुत्र तो असावा !
वशिष्ठापरि शिरीं अभय-हस्त-धर्ता !
गाधि-पुत्रापरि असो सत्व—हर्ता !

ही तिची शेवटची मागणी ऐकून धन्याच्या आज्ञेप्रमाणें सत्वधीर राजा हरिश्चंद्र तारामतीवर खड्ग घेऊन उठला व हात उगारून तें तिच्या मानेवर मारणार तोंच विश्वामित्रानें तावडतोब येऊन त्याचा हात वरच्यावर धरिला. रोहिदासास पुढें आणून उभें केलें. डोंबास सर्व हकीकत विनेदन करून त्याच्यापासून हरिश्चंद्रास सोडवून तो पुनः त्रिवर्गासह अयोध्येस परत आला. त्यावेळीं,

## १३५ आर्या [ गीति ]

पुरमार्गि रीघ न मिळे
नर, स्त्रिया, बालवृंद बहु जमला
जेंसे नभिं पक्षी-गण,
न दिसे रवि त्यामुळें जणूं दडला

## १३६ दिंडी.

राजसिंहासनिं बसवुनी नृपाळा देवलोकीं मुनिराज तदा गेला
हर्ष झाला लोकांस तया कालीं कथा प्रेमळ संपूर्ण इथें झाली

**संपूर्ण.**

# * स्फुट पद्य.

( संतकवि दासगणू विरचित )

चाल [ शारदे, हंसका० ]

हे मना ! गड्या सज्जना ! समज धरिं कांहीं
या नरतनुसम पर्वणी दुजी बघ नाहीं धृ०
गमविना अशी ही सुगी, मुढा ! वाउगी सोय बघ आतां
जाशील अंतिं यमलोकिं खावया लाथा १
नसनसे लवहि भरंवसा, बुडबुडा जसा उठे, फुटे फटकन्
तशि आयु[1] झुळुक वाऱ्याची समज धरिं झटकन् २
जोंवरी तुझा बा प्राण, तोंवरी जाण सुहृद्[2]जन साथी
लावूनि रिकामा मोह रौरवा[3] नेती ३
राहतील जागचे जागिं, शेत, बाग बगी, राहता वाडा
करिशील स्मशानीं शयन शेवटीं उघडा ४
तनुचा रे ! किती अभिमान, वाहसी जाण गड्या ! मायेनें
परि काष्ठ, शुंभांचें[4] तिला अखेरीस लेणें ५
गणुदास ह्मणे हे मना ! भुलुं नको कुणा, पंढरी राणा
घे करुनि आपुला, तरिच जगीं तूं शहाणा ६

---

* निरूपणास उपयुक्त १ आयुष्य २ आप्त इष्ट वगैरे ३ नरकाला ४ गाढी ५ निद्रा ६ गोवऱ्यांचें.

# *गरुड-गर्व-हरण.

( कविवर्य चूडामणी-सुत विरचित )

पद [ चाल—नरजन्मामधिं ]

तीर्थें हिंडत द्वारावतिसी[1] मारुति अवचट[2] पाहे
नेत्रीं प्रेम-नीर बहु वाहे
सदा स्मरण तारक मंत्राचें, वदनीं रामा वाहे[3]
चित्त स्थिर करुनीयां राहे

त्या सोन्याच्या द्वारकेकडे पाहून मारुति मनांत ह्मणतोः—

सुवर्णनगरी प्रभुनें[4] माझ्या दिली सेवकाला[5] हे
अजुनी तिस तरि तेजहि आहे
संशय मानित असतां आले नारदमुनी लवलाहें
वंदुनि प्रेमळ अंगीं वाहे

भेटीबरोबरच उभयतांचीं पुढील प्रश्नोत्तरें झालीं:—

राजा येथिल कोण?' वदे मुनि, 'वासुदेव गुणराशी
नाम-स्मरणें भव-भय नाशी ध्रु०
घनःश्याम श्रीकृष्ण दयाघन विभु द्वारकावासी ना० १

नारद ह्मणाले मारुते! या नगरीचा राजा 'बलराम' आहे.

मुख्य नाम बलराम ऐकतां 'राम एक असुरारी[6]
निज-पद-दासाचा कैवारी'

मारुतीनें नारदास सांगितलें कीं, नारदा! येथील राजाला माझा असा निरोप कळवा कीं,

"सोडुनि द्यावें नांव आतां तरि वार्ता सांगा सारी
ना तरि युद्धा या दलभारीं[7]
किंवा बुडवूं नगरि समुद्रीं, नेउनि घालूं गारीं[8]"

मारुतीचें हें ह्मणणें ऐकून,

नारद तोषें[9] गिरक्या मारी
कृष्णाजवळी येउनि सांगें, 'संकट आलें भारी
नगरी[10] बुडविल तो निर्धारी'

---

* हें आख्यान एकाच पद्यवृत्तांत आहे. १ द्वारकेस. २ अनपेक्षित प्रसंगानें. ३ धारण करी. ४ रामानें. ५ बिभीषणाला. ६ राक्षसांचा शत्रु. ७ सैन्यानिशीं. ८ दरींत—भूमींत. ९ आनंदानें. १० द्वारका.

हें ऐकून श्रीकृष्णपरमात्मा,

पुत्रबंधुला[1] शंकित[2] वदला अजिंक्य जो काळासी     ना० २

" आतां ऐसा कुणी असे कीं, शांत करी कपिराया

पैकेना तो पडल्या पायां

असा विचार करीत त्यानें गरुडास बोलाविलें व ह्मटलें.

' जा ! जा ! गरुडा ! तूंच तयाला बांधुनि लावीं माया[3]

बोलाविती कृष्ण आणाया

खगेंद्र ह्मणतो, " दीनवत्सला ! अशा क्षुद्र[4] कामा या

धाडुनि तेज बुडविता वायां

त्रैलोकीं मी बलसामर्थ्यें वंद्य होय गुण गाया

जावें मर्कट धरुनि आणाया

राग आला तरि वामकरानें[5] ओढित आणिन पाया

अथवा जिवेंचि मारिन घायां[6] "

हें ऐकून कृष्णाला हंसूं आलें. पण तें दाबून बाह्यतः तो गरुडास ह्मणालाः—

' नको नको बा ! सजीव आणीं, ' प्रार्थित अंतर्वासी[7]   ना० ३

श्रीकृष्णाचा फारच आग्रह जाणून शेवटीं तो गरुड—

गेला तंव, " का ऊठ मर्कटा ! चाल द्वारके आतां

मोठ्या फार सांगसी वाता[8] "

येशिल किंवा ओढीत नेऊं, आपटिन जातां जातां "

या गरुडाच्या भाषणाचे वेळीं, मारुति राम-गुण गाण्यांत रंगून गेला होता; तेव्हां त्या त्याच्या भाषणानें,

केलें विघ्न राम-गुण गातां

या पाखरानें विनाकारण काय बडबड लाविली आहे; ह्मणून मारुतीनें

चापट दिधली जंव तोंडावर करकर खाउनि दांता

काळहि[9] सोसेना ज्या हाता

उडे फडफडा, पडे मागुती, सोडितसे मुखें—वाता[10]

' हा मज वांचुं देइना आतां '

शेवटीं प्राण वांचवून परत जाण्याकरितां धडपड करूं लागला.

काकुळतीनें पडे, अडखळे, ' पाहिन श्रीकृष्णासी '   ना० ४

---

१ प्रद्युम्नादिक व बलरामास. २ संशयानें. ३ लोभ. ४ हलक्या. ५ डाव्या हातानें. ६ घायाळ करून प्राण घेईन. ७ श्रीकृष्ण. ८ गप्पा. ९ यम. १० तोंडानें श्वास सोडूं लागला.

धापा टाकीत आलेल्या गरुडाला पाहून श्रीकृष्णः—

आणिला किंवा तुझ्या चपेटें[1] ठारचि वानर मेला !
वद्‍ वा ! कसा पराक्रम केला ?
अल्प गोष्टिला धाडुं नये परि समय येउनी ठेला[2]
त्यावरि आवडता तूं चेला[3]

श्रीकृष्णाचें हें भाषण गरुडाला दुःखावर डागण्या दिल्याप्रमाणें वाटलें व तो ह्मणाला:—

'चक्रपाणि ! जाचणी[4] पुरे ही, अवघी आपुली हेला[5]
दाटे कंठ, परि मग प्याला[6]

आणि झालेली हकीकत सांगूं लागला,

"जंव चपराँ[7]कहि बसली तोंडीं वाटे प्राणचि गेला
वळकट—मन त्यां सोसुनि नेला
केली शोभा येथ हातानें तरि मी ह्मणतों खाशी" ना० ५

गरुड ह्मणाला, 'देवा ! आतां कांहीं उपाय करूं नका. फक्त एकच गोष्ट करा—

'सोडा एकाचि नांवं कपी तो न ढळे[10] कोणालागीं' पृथ्वी पालथि घालिल रागीं[11]

गरुडाचें हें निराशेचें भाषण चाललें आहे तोंच

प्रद्युम्नादिक क्रोधभरित ते होउनि आले यागीं[12]—
"वानर आणुनि बांधितों पागी[13]

हा प्रतिज्ञा बोलून दाखवितांच ताबडतोब त्यांनीं निघण्याची तयारी केली.

दल-भारानें सिद्ध होउनी, येउनि बघती बागीं[14]
बसला भगवद्गुणमनरागी[15]
बाण सोडिती, अगणित पडती लागुनि पृष्ठीभागीं
ह्मणुनि फुलें काय मदनांगीं
पुच्छ धरोनी ह्मणती, 'तुजला बोलावी मधुवंशी[16]' ना० ६
सांपडला रे ! ओढा वानर, न्यावा गांवापाळी

असें ह्मणून त्या सर्वांनीं शेंपूट धरून ओढतांच,

मारुति तेव्हां पुसाले[17] चाळी
समुद्रावरी नेउनि झाडी, छाडी देश आभाळीं
बुडती उदकीं[18], कोणीं गाळीं[19]

---

१ थापडीनें. २ प्रसंग पडला. ३ शिष्य. ४ छळ. ५ लीला. ६ दुःख गिळून घेतलें. ७ थप्पड. ८ उत्तम. ९ बलराम. १० हलत नाहीं. ११ रागाच्या भरांत. १२ वाणी-भाषणांनीं. १३ घोड्याच्या पागेंत. १४ बागेंत. १५ प्रभुगुणांत ज्याचें मन रंगलें आहे असा—**मारुती.** १६ कृष्ण १७ त्यानें शेंपटाला चालना दिली. १८ पाण्यांत १९ चिखलांत.

बुडती, मरती, तरती, पळती; पुच्छ पदीं वेटाळी[1]
आपण निर्भय वाजवि टाळी
पुत्रें[2] लाजुनी वदती, ' आतां काय ह्मणेल वनमाळी '
वदनीं शोभा आली काळी

ते कसें तरी तोंड लपवीत लपवीत जीव वांचवून घरीं आले. त्यांना पाहून आनंदित मुद्रेनें कृष्णः—

आणिला वानर बरा धरोनी बांधा बळकट त्यासी ना० ७

प्रभूनें पाहिलें तों सर्वांचीं तोंडें हिरमुसलेलीं; आणि वानराचा तर कोठें पत्ता नाहीं. नंतर पुनः गरुडासच बोलावून देवानें ह्मटलें:—

" आतां खगेंद्रा ! तूंचि आण बा ! करुनि नीतिनें[3] अर्जी
गोष्टी बोलुनि, राखुनि मर्जी
सीतापतिचें नांव घेइ तो प्रियकर माझा पुर्जी
ऐकिल तुझें कधीं ना वर्जी[4] "

गरुड ह्मणतो देवा ! ही युक्ति बरी आहे, परंतु,

" यद्यपि आला राम-दर्शना, होउनि येईल गर्जी[5]
येथें राम दिसेना जर्जी[6]
मग तो माझा प्राणचि घेइल शस्त्रें रागें फर्जी[7]
शेवटिं नगरी सर्वहि भर्जी[8]
नका पाठवूं मला तयाचें भय वाटे मानसी " ना० ८

गरुडाचा गर्व पूर्णपणें हरण झालेला पाहून देवानें त्याला सांगितलें कीं,

" आतां तुझें तो नांव घेइना आणिच त्या गुणपात्रा[9] "

पुनः आपल्यालाच जावें लागतें, हें पाहून,

येरू[10] थरथर कांपवि गात्रां[11]

नंतर गरुड मारुतीला आणण्याकरितां निघाला.

भीत भीत नेत्रहि मिचकावी; दिवसा मानी रात्रा[12]
मानसिं भितोच वानरमात्रा[13]
दुरुनी पाहे जवळि न जाई ' काय नेमिलें धात्रां[14]
आली शेवटची ही यात्रा[15] '

अशा स्थितींत कसें तरी मारुतीच्या जवळ जाऊन त्यानें—

---

१ शेंपूट पायांत वेटाळून ते अडखळूं लागले. २ प्रद्युम्नादिक. ३ योग्य सत्कारानें ४ टाळणार नाहीं. ५ गरजी—गरज असलेला. ६ जर जी. ७ बुद्धिबळांतिल वजीर. ८ जाळील. ९ गुणांनीं पात्र अशा मारुतीला १० तो—गरुड. ११ शरीर. १२ रात्र. १३ यःकश्चित् माकडास. १४ ब्रह्मदेवानें. १५ मृत्यू.

वंदन केलें हात जोडुनी, सांडुनि सर्व क्षात्री
नामस्मरण घेतसे मात्री

इतक्या नम्रतेनें तो गरुड मारुतीस विनंति करूं लागला कीं, मारुते !

सीतापति श्रीराम तुह्माला बोलावी सुखराशी ना० ९

इकडे तोंपर्यंत भगवान् श्रीकृष्ण परमात्मा

इच्छामात्रें रचून मोडी ब्रह्मांडाच्या राशी
झाला राम—अयोध्या वासी
पाठिं उभा सौमित्र, मित्रसम चामर वारि सुहासि
अक्षय तूणिर शरचापासीं

स्वतःची तयारी झाल्यावर लागलींच नारदाला हांक मारून देवानें सांगितलें:—

" आतां नारदा ! तुह्मींच जावें सत्वर त्या धामासी
आणा सीता बनवुनि खाशी "

हें ऐकून नारदमुनि लागलींच सत्यभामेच्या घराकडे निघाला व

पळताचि आला, चल उठ भामे ! विलंब न करीं, कासी
पीतांबर बरवा रूपासी
वाट पाहतो राम सभांतरिं शरयूतीर-विलासी ना० १०

इकडे सत्यभामेला आपल्या सौंदर्याचा गर्व झाला होता. श्रीकृष्णानें रामरूप घेतलें आहे, आणि सीतेकरितां रुक्मिणीकडे न जातां मजकडेच बोलावणें आलें त्यामुळें तिचा आनंद गगनांत मावेना.

गडबड जाणुनि राम—दर्शना घाबरली ती बाळी
काजळ घेउनि लावी भाळीं
कुंकुम घाली नेत्रीं, दाबुनि नाकीं बुगडी, बाळी
चरणां बांधित मौक्तिक—जाळी
नथ सरज्यांची केशा बांधुनि, मस्तकिं घाली चोळी
गुडघ्या बांधितसे गरसोळी

लगबगीनें ही तयारी करून ती नारदास ह्मणत्ये:—

" नारददेवा ! बरें पहा हो हंसतिल, करितिल रोळी
सीता दिसते अति तेजाळी

नारदानें बोलावयास वेळ नाहीं, हें जाणून तशा स्थितींतच ती सत्यभामा—

---

१ वीरत्वास. २ औषध-रसायन. ३ लक्ष्मण ( बलराम ) ४ आनंदित. ५ धनुष्य बाणाच्या भात्यानिशीं. ६ ( सत्यभामेच्या ) घराला. ७ फक्कड. ८ उशीर. ९ नेस, परिधान कर १० सत्यभामा. ११ कपाळीं. १२ नथेला मुख्य मोत्यांच्यावर कळीप्रमाणें मोत्यें लावतात त्याची. १३ फटफजीती १४ तेजस्वी.

धरिली पदरीं, आणिली ओढित, दाखविली रामासी   ना० ११

तांतडीनें नारदमुनीनें देवास ह्मटलें, देवा !

ही घ्या ! आणिली सीताबाई, पहा खरी कीं खोटी
म्यां ही खटपट केली मोठी

देवानें सत्यभामेला निरखून पाहिलें व ह्मटलें कीं ' नारदा ! '

वरें सोंग हें सभेंत दिसतें, काजळ फाराचि घोटी
डोइस काय आहे चिंधोटी !
जरी मारुती असता येथें, थोर वाढते कोटी
कोणा हंसूं न मावे पोटीं
घ्या ! जा ! परतुनि नारददेवा ! उतरा खूप कसोटी
दावा दर्पण, सांगा गोष्टी

हें पत्नीचें भाषण ऐकून.

आली लाजुनि घरास भामा, पुसतये ब्रह्म-सुतासी   ना० १२
" स्वामी ! सांगा कैसी होऊं जनक—नंदिनी श्यामा
जेणें तोष होय श्रीरामा
अलंकार परिधाना आणुनि पुढें ठेविल्ये भामा
थरथर कांपे भरली घामा
" पुरें करीं चतुराई बाई ! आळस नको या कामा
आतां वानर येतो धामा "
" जा ! जा ! परतुनि नारददेवा ! सांगा हो घनःश्यामा
पहिल्याहुनि ती बनली रामा "
" चाल त्वरेनें, भरतो रागें, दाशरथी—नेमासी " ना० १३

इकडे उद्यानांत गरुडानें हात जोडून मारुतीची विनंति केली होती, तेव्हां,

कानीं पडतां अवचट वाणी, सीता-पतिची कीर्ति
उठला गमन आठवे, स्फूर्ति
मार्गीं जातां वैनतेय तो पडला चिंताऽवर्तीं
" आतां ढगढंग करितो पूर्ती
जरी घरीं ती दृष्टिं न पडतां दाशरथीची मूर्ति
तरि मग आयुष्य झालें भरतीं

१ कल्पना. २ आरसा. ३ नारदास. ४ सीता. ५ सुंदर. ६ आनंद. ७ वस्त्रालंकार ८ घामाघूम झाली. ९ मारुती. १० कृष्णमंदिरीं. ११ रामाच्या वेतास. १२ अनपेक्षित. १३ गरुड. १४ काळजीच्या भोंवऱ्यांत. १५ फटफजीती. १६ पुरती.

दोघेही कृष्णमंदिरापर्यंत आले. सत्यभामेचा अद्याप शृंगार चालूच होता.

कपिवर आला कळलें देवा, रुक्मिणी येउनि अंतीं[1]
विद्युल्लतेसमानें[2]—स्फूर्ति
वसली अंकीं[3] रघुत्तमाच्या, चपला जशि आकाशीं ना० १४

सीता लक्ष्मणासहवर्तमान सिंहासनावर श्रीरामचंद्रास पाहून,

अंजनि-सुत लोळे चरणावरि, " श्रीहरि! मजला तारीं
होसीं पूर्ण ब्रह्म अवतारी
शर[4]-कार्मुक[5]-पीतांबर[6]-धारी, तो हा रावण मारी
झालों धन्य! धन्य! संसारीं "

दर्शनसुखांत मारुती तल्लीन झालेला पाहून,

माया व्यापुनि पुनरपि झाला रुक्मिणिसह कंसारी[6]

पुनः डोळे उघडून पाहतांच

कपिवर चंचळला[7] संचारी
तेंच रूप हें समजुनि राहे, पाहतां ज्ञानविचारीं
' सर्वहि ब्रह्म '[8]-वाक्य निर्धारी

याप्रमाणें, गर्व झाला असल्यास त्याचें हरण करणें, द्वैतबुद्धीचा नायनाट करणें. इत्यादि प्रभूचें भक्त-वात्सल्य पाहून कवि ह्मणतातः--

चूडामणि-सुत-विठ्ठल-स्वामी दीनजनाची काशी ना० १५

संपूर्ण.

१ इकडे. २ वीज. ३ मांडीवर. ४ बाण. ५ धनुष्य. ६ कृष्ण. ७ संशयांत पडला. ८ ' सर्वं खल्विदं ब्रह्म. '

# * स्फुट पद्य.

( संतकवि दासगणू विरचित )

चाल–[ श्रीमंत पतीची० ]

भुलुं नको मना ! संसारा ना येथ सुखाचा वारा ध्रु०

दुःखाचें मूळ संसार
तुज करिल बहुत बेजार
लोभाचें करुनि मांजर
तुज फिरविल दारोदारा ना येथ० १

मानिसी जयांतें गोत[1]
ते वैरि तुझे साक्षात
ढकलुनी मोहभवऱ्यांत
तुज फिरवितील गरगरा ना येथ० २

कामिनी नव्हे कटियार
प्रेमाचा करिल तुज वार[2]
वा खरुज कोरडी थोर
खाजवूं नको खरखरा ना येथ० ३

नको होउं मना तूं ! धुंद
धरि 'विठ्ठल' नामें छंद
तरिच हा तुटे भव[3]-बंध
काथि गणू करूनि विचारा ना येथ० ४

---

* निरूपणास उपयुक्त १ सोयरेधायरे २ प्रहार, मारा. ३ संसारबंधन.

# पतितोद्धार.

[ कविवर्य रुक्मांगद-सुत-विरचित. ]

## आर्या [ गीति. ]

श्री एकनाथयोगें सत्क्षेत्र श्रेष्ठ हें प्रतिष्ठान[1]
गुरु परिचर्येनें[2] जेथें श्रीमान्यप्रभुचिही प्रतिष्ठा[3] न

## २ पद [ चाल-हटातटानें पटा० ]

एकाधिक[4] दशमावरि टीका नाथें सुंदर केली
भक्ति-ज्ञान-विरक्ति व्याली
उद्धव तरला ज्ञानकलेनें, त्याची संसृति[5] हरली
त्यानें ब्रह्मरूपता वरिली
वाङ्मय भगवन्मूर्ति हरीची स्पष्ट दिसे अवतरली
नाथालागिं सदा अनुसरली
संत-समागम मुमुक्षु लोकां जाणा प्रयाग, काशी
नाम-स्मरणें भव-भय नाशी ध्रु०
रमा-रमण खल-दमन विष्णु तो निज भक्तांतर्वासी ना० १

याप्रमाणें भागवतधर्माचा उपदेश आबालवृद्धांना सरसहा चालू असल्यामुळें

भाविकजन येउनी प्रार्थिती नाथ! भोजना यावें
येउनि पावन शीघ्र करावें
प्रतिगेहीं जेवाया जाती, आन्हिक[6] सारुनि भावें
उपदेशिति, ' घ्या हरिचीं नांवें '
नाथाकरितां पाट रुप्याचे, ताट हेममय[7] व्हावें
यास्तव भक्त-समुह तो धांवे
ईश ज्या अनुकूल तयाच्या सिद्धी सहजचि दासी ना० २

पैठणच्या नागरिकांनीं मोठ्या थाटानें नाथांस जेऊं घालावें.

## ३ पद [ कटाव. ]

उदबत्त्या लाविती सुवासिक; रांगोळ्या त्या बहूपरीच्या; रावे, चिमण्या, बदक, साळया; झाड सरूचें मोर काढिती समोर जणुं काय थै थै थै थै नाचत येती; समया समयावरी लाविती; शीघ्र गतीनें पात्रें वाढिति; लवणचूर्ण, हरिमंथर्क[8] व्यंजनें[9]; निंबाम्लेंकर[10]

---

१ पैठण. २ गुरुची सेवा करून. ३ योग्यता. ४ एकादशस्कंध. ५ जन्ममरणांची फेरी. ६ नित्य ब्रह्मकर्म. ७ सोन्याचें. ८ हरभरा. ९ चटण्या. १० लिंबाचें अंबून.

सालरायतें, रुचिर आयतें, वृंताकादिक शाखा, पापड माषान्नाचे कुडकुड वाजति; वटक, वोंड अति गोड मनोहर; उर्वारुक कोशिंबिर सुंदर; अंबे मोहर तांदुळ, ओदन, परस्परें देती अनुमोदन; वाट्यांमध्यें वाढिती तेमन, तें मन पाहतां सुतुष्ट झालें; बुंदी, जिलबी, घीवर, पायस; साखर फेणी, केशरवर्णी; खूप लोणकढ तूप वाढिती; भोजन झाल्या विडे त्रयोदशगुणी खाउनी, अपुल्या अपुल्या गृहा जाउनी, नाथाची बहु कीर्ति वानिती; ऐसें असतां, महाद्या नामें महार जातिचा, त्याच्या चित्तीं आवड झाली, नाथ भोजना यावें ऐसी; त्या संकेतें शीघ्र निघाला, एकनाथ-पदिं नमुनि बोलला, 'यावें माझ्या घरिं अशनाला,' 'हो हो' ह्मणतां प्रमोद झाला भारी । भक्ताच्या प्रेमाकरितां झाला कीं नाथ मुरारी १

नंतर महाद्या घरीं येऊन,

## ४ आर्या [ गीति. ]

बोले स्त्रीला प्रेमें, सांगितलें नाथराय जेवाया
साधु घरासी येतां सफल जिणें, नित्य जात जें वायां

## ५ दिंडी.

वरें केलें परि नाथ कसे येती ! घरीं पतितांच्या अन्न कसें घेती ?
ह्मणे संतांसी विषम दृष्टि नाहीं ! नीच-सर्वोत्तम वर्ततांहि देहीं

## ६ साकी.

एकनाथ गुरु अशना येती संशय न धरीं कांहीं
स्मृति-वचना परि श्रवणें परिसुनि सत्कारा हो साही

## ७ पद [ येरे गरुडावरि. ]

दोन रुपये पतिराया ! सदन्ना घ्या पाक कराया
तंदुल, साखर, घृत खाया, गोधूम-पोळया माखाया
दोघा वस्त्र आणा; पाया- पडत्यें ध्याउनि यदुराया

असा परस्परांचा विचार होतांच,

आणिली सामुग्री सारी सखा दासाचा कैवारी १

अतिशय उल्हासानें सर्व स्वयंपाक तयार करून स्त्री महाद्यास ह्मणत्ये:—

---

१ वांग्याच्या. २ भाज्या. ३ उडदाचे. ४ वडे. ५ कांकडीची. ६ भात. ७ कढी, ८ विचारानें. ९ भोजनाला. १० आनंद. ११ श्रीकृष्णानें नाथाचें रूप घेतलें. १२ महाराच्या. १३ भेद. १४ लहानमोठ्या. १५ रिक्तपाणिनेंग. १६ साह्य. १७ पक्वान्नाकरितां. १८ गव्हाच्या.

## ८ आर्या [ गीति. ]

“ बोलावुनि आणावें, झाला कीं पाक सिद्ध सत्वर[1]तें ”
ऐकुनि गमनचि केलें, ‘ जातों ’ ऐसें ह्मणूनि सत्व[2]-रतें

गुरुमहाराजांना तो महाया शुचिर्भूत स्थितींत बोलावूं गेला.

## ९ साकी.

निर्मल धोतर करी सोवळें, सुभस्म लावि कपाळीं
मृण्मय[3]-पात्रा हातीं घेउनि, आला नाथाजवळी

## १० पद [ चाल—अंकित पदां० ]

“ नाथ ! चलावें घरा अशनासी ध्रु०

महाया महार नाथास जेवावयास बोलावितो, हें पाहून,

बुधजन ह्मणती विस्मय[4] पावुनि “ कलि धर्माऽचल[5] नाशी १
श्राद्धदिनीं ब्राह्मण त्यागुनियां अन्न दिलें पतितासी[6] २
चोरुनि जेवित असतिल जरि तरि कळुं न देति इतरांसी ” ३
पापचि उघडें पडलें ह्मणुनी करिती उपहासासी ४
रुक्मांगदजा वाइट वाटे ऐकुनि दुर्वचनासी ५

## ११ श्लोक [ पृथ्वी. ]

महार तुह्मि जातिचे, मुळिं तुह्मा घरीं जे मना
कसें तरि करूं न जें सुकर सद्बुधाच्या मना

नाथांचें निराशा उत्पन्न करणारें वाक्य ऐकून महाया ह्मणतोः—

जसें वचन दीधलें तशिच पूर्ण मत्कामना—
करून कृतकृत्य या झणिं करा; वृथा कीम ना

## १२ आर्या [ गीति. ]

भगवद्वचन[11] तुह्मांला ठावें म्यां फार काय बोलावें
हरि सांगे जिष्णूला[12] ऐकुनि पाषाण-मनहि ओलावें

## १३ पद [ चाल—हटातटानें ]

भगवद्वचनेंहि जरी कळला. आत्मा अलिप्त देहीं
तरि उद्धट[13] नच व्हावें गेहीं

---

१ लौकर. २ सत्वगुणाच्या ठिकाणीं रममाण झालेल्या महायानें. ३ मातीचें भांडें, गाडगें. ३ आश्चर्य. ५ धर्माचा पर्वत. ६ महारासी. ७ चेष्टेला. ८ वर्ज्य. ९ योग्य. १० इच्छा. ११ यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते ॥ सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते ॥ गीता अ० १३ श्लोक ३२. शां. भा. किमिव न करोति न लिप्यत इत्यत्र दृष्टान्तमाह—यथा सर्वगतं व्याप्यपि सत्सौक्ष्म्यात्सूक्ष्मभावादाकाशं खं नोपलिप्यते न संबध्यते सर्वत्रावस्थितो देहे तथाऽऽत्मा नोपलिप्यते. [ आत्मा देहधर्मांनीं संबद्ध होत नाहीं. ] १३ स्वैर.

ब्रह्मनिष्ठ नर त्रिलोक—पावन जरि झाला, त्यानेंही
' न त्यागावा स्वधर्म हें हि-
श्रीहरीच बोलले अर्जुना, याची खूप नवाई
विस्तृत केली तृतियाध्यायीं
पात्र शुद्ध जाहल्यावांचुनी कामिं नये पाकासी नाम० १

## १४ ओवी.

शुद्ध पात्र कशानें होतें ? हें सांगावें तुह्मी मातें
ही त्याची शंका ऐकून नाथांनीं समाधान केलें कीं,
अग्निसंस्कारावांचून त्यातें शुद्धि नाहीं सर्वथा

## १५ आर्या [ गीति ]

मग नवल मानुनियां गेला तो निजगृहास माहार
सें तसें करि; तें, पाहुनि तुष्ट होय माहार

## १६ ओवी

REFBK-0002843

प्रणश्यति ' ऐसी माझीच गीतोक्ति
भाव कायली धनंजयाप्रति ऐसें स्वांतीं चिंतितसे

तेव्हां तें ब्रीद रक्षण करण्याकरितां, नाथांना, त्यांचें स्वधर्म—पालन, वचनांतून मुक्त होण्याकरितां व पतिताचा उद्धार करण्याकरितां,

## १७ पद [ चाल—गज्जल ]

ये धांवूनि नरकारी साहाकारी स्वकीयांचा
अशेषा सात्विका तारी ओतारी सर्व जीवांचा ध्रु०
येउनीया हांका मारी सुकामारीस प्रिय जो का
जेउनी तृप्तही झाला नव्हे साला, न दे झोंका १
देखणा शेला पांघुरवी बहु बरवी दिसे मूर्ति
असा तो नाथार्पण ह्मणून केलेला आहेर घेऊन परमात्मा,
नाथासि ठेवुनी गेला—स्वगेहाला; अतुलकीर्ति २
कुवसना पाहतां नाथा स्वनाथाचीच ही लीला
न वाटे काय कृष्णाई विठाई भाव भूकेली ३
यावरून पतितोद्धारास संत कसे कारणीभूत होतात हें पाहून कवि:—
असा इतिहास संताचा वसंताचा चिरागम हा
आभासे हेमांगद—तनुजा सुमनुजा तारक हाच्चि पहा ४

संपूर्ण.

---

१ नवल. २ स्वयंपाकाकरितां. ३ महाद्या. ४ लक्ष्मीपति ५ अर्जुनास. ६ मनांत. ७ नरकासुराचा शत्रु. ८ सर्व. ९ भक्तांस. १० घडशियाला—निर्माण करणारा. ११ मेहुणा. १२ हलकीं वस्त्रें. १३ रुक्मांगद-सूनात.

# मालेवरील अभिप्राय.

स्वराज्य ( पुणें ता. ७।२।२४ ):—या मालेचीं दोन पुस्तकें रा. ग. अ. सराफ नांदेड ( निजाम स्टेट ) यांचे कडून आलीं आहेत. कीर्तनाला उपयोगी अशा प्रकारचीं निरनिराळ्या कवींनीं केलेलीं आख्यानें या पुस्तकांतून प्रसिद्ध करण्यांत आलीं आहेत. त्यांत नांदेड येथील सुप्रसिद्ध अर्वाचीन व उत्कृष्ट कवि श्रीयुत **दासगणू** यांची कान्होपात्रा व अहल्याबाई होळकरीण हीं आख्यानेंहि छापलीं आहेत. या पुस्तकमालेंतील इतर आख्यानेंहि फार चांगलीं आहेत.

---


**मासिक ]** **श्री साईलीला.** **[ पुस्तक.**

पृष्ठसंख्या ४०, वार्षिक वर्गणी रु. ३—६—० ट. ह. सह.

या मासिकास चैत्रापासून दुसरें वर्ष लागलें आहे. यांत शिर्डीचे ( ब्रम्हीभूत ) श्री **साईबाबा** यांच्या लीलांचा व बोधामृताचा संग्रह गद्य व पद्यरूपानें केला जात आहे. श्री साईबाबांच्या भक्तांनीं व इतर मुमुक्षूंनीं अवश्य संग्रहीं ठेवावें.

**पत्ताः**—गोविंद रघुनाथ दाभोळकर. श्रीसाईलीला कार्यालय.

५ सेंटमार्टिनरोड **वांद्रे** ( मुंबई नजीक ) बी. बी. सी. आय्. रेल्वे.

**छापत आहे )** **श्रीनामदेव** **( नांवें नोंदवा**

## महाराजांचें काव्यमय चरित्र.

श्री संतशिरोमणी **नामदेव** महाराजांचें काव्यमय साग्र चरित्र रा. रा. **देवीदास लक्ष्मण महाजन** नांदेड, ह्यांनीं लिहिलें आहे.

त्या चरित्राचे तीन खंड असून पूर्व खंडांत, नामदेवाचें देवास दूध पाजविणें व कीर्तनांत मेलेली गाय उठविणें; मध्य खंडांत, नामदेवाच्या कीर्तनांत गोरोबा कुंभारास हात फुटणें व औंढ्या नागनाथाचे देवळांत सर्वत्र शिवलिंगें पाहून विसोबाखेचरास गुरु करणें; आणि उत्तर खंडांत परिसाभागवतास कृतार्थ करणें व औंढ्यानागनाथाचें देवालय कीर्तनप्रसंगीं फिरविणें; इत्यादि विषय आहेत. चरित्र फारच रसाळ व प्रासादिक असून ह. भ. प. श्रीसंत **दासगणू** महाराज ह्यांनींहि त्याची शिफारस केली आहे. आह्मीं तें चरित्र छापवून प्रसिद्ध करीत आहोंत. प्रति फारच नियमित निघणार असल्यामुळें आगाऊ नांवें नोंदविणारांस पुस्तक मिळण्याचा संभव आहे. करितां खालील पत्त्यावर त्वरित नांवें नोंदवावींत.

**विठ्ठल लक्ष्मण सुबंध प्रोप्रायटर, " नामदेव प्रेस, "** शिंपी आळी,

११७० मेनस्ट्रीट **पुणें—लष्कर.**

# विक्रीस तयार !

श्री शिवरामस्वामीकृत.

| | | |
|---|---|---|
| श्री बोध वासष्टी. | [ पद्य ] | ८२ |
| श्री शिव प्रदोषपूजा. | ( ,, ) | ८२ |

श्री सीतारामबुवा टेंबेकृत.

| | | |
|---|---|---|
| श्री वासुदेवानंदस्तोत्र | ( संस्कृत. ) | ८१ |

श्री ह. भ. प. दासगणूकृत.

| | | |
|---|---|---|
| श्री भक्तलीलामृत | ( ओवीबद्ध अ. ४२ ) | १॥ |
| श्री संतकथामृत | ( ,, ६१ ) | २ |
| श्री गोदामहात्म्य | ( ओवीबद्ध अ. ३१ ) कागदी १।; कापडी | १॥ |
| श्री पांडुरंगस्तोत्र | ( ओवीबद्ध ) | ८३ |
| श्री व्यंकटेशस्तोत्र | ( ,, ) | ८३ |
| श्री शिष्यबोध | ( ,, ) | ८३ |
| श्री चक्रीभजन | ( पद्य ) | ८३ |
| श्री ईशावास्य भावार्थ बोधिनी | ( ओवीबद्ध ) | ८३ |

न. रा. काहळेकरकृत.

| | | |
|---|---|---|
| श्री दाजीमहाराज टाकळीकर-चरित्र | ( गद्यपद्य ) | ८३ |

दे. ल. महाजनकृत.

| | | |
|---|---|---|
| श्री दत्तजन्म | ( पद्य ) | ८३ |
| श्री दाजीमहाराज पंचपदी | [ ,, ] | ८१ |
| श्री सिद्धारूढ स्तोत्र | ( ओवीबद्ध ) | ८३ |

द. अ. सराफकृत.

| | | |
|---|---|---|
| श्री तुकाराम म. येहळेगांवकर-चरित्र. | | ।- |

बाळगणूकृत.

| | | |
|---|---|---|
| श्री वासुदेवानंदस्तवनमाला | ( चरित्रासह ) | -।- |
| श्री वासुदेवानंद भजनलहरी | [ अभंग ] | -।- |
| श्री सातवारांचें भजन | [ ,, ] | ८३ |
| श्री गोदामहात्म्य | ( ओवीबद्ध ) | ८३ |
| श्री दत्तस्तोत्र | ( ,, ) | ८१ |
| श्री येसादेवीस्तोत्र | ( श्लोक ) | ८८॥- |
| श्री हनुमानपूजा | ( ओवीबद्ध ) | ८१ |

सूचनाः—सर्वच पुस्तकें एकदम मागविणारांस ट. ख. माफ.

पत्ताः-गणेश अनंत सराफ मु. पो. नांदेड ( निजामस्टेट. )